कृषीवल
रायगड, रविवार, दि. २१ जुलै २०२४
किंमत ४ ₹

## नीट परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चाचणी संस्थेने शनिवारी दुपारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेचा, अर्थात नीट यूजीचा निकाल जाहीर केला. सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला शनिवार, दि. २० जुलै रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत निकाल जाहीर करण्यासाठी मुदत दिली होती. ही मुदत संपण्यापूर्वी पाच मिनीट आधी एनटीएकडून नीट यूजीचा निकाल जाहीर केला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, नीट परीक्षेतील घोटाळ्याची व्याप्ती लक्षात येण्यासाठी शहरनिहाय आणि केंद्रनिहाय स्तरावर या परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना exams.nta.ac.in. या संकेतस्थळावर निकाल पाहता येणार आहे.

12 ACRES OF N.A. LAND FOR SALE IN NERAL, TALUKA KARJAT
Flat Land, located in a Residential Zone, just 7 kms from Neral Station. Ideal for plotting Scheme Development, Bungalow Scheme, Resort, or Housing Project.
PANVEL LAND FOR SALE
10 acres of land, located 4 kms from Shedung Toll Plaza, with 800 meters of Frontage on the Mumbai-Pune Highway. Just 10 kms from Phalaspe Phata. In Commercial Zone Under MSRDC DP.
For pricing & details call 9867008432




# पवारांचा प्लॅन ठरला

## विधानसभेत आघाडी बहुमतात येणार

## महायुतीला मतदार जागा दाखवतील

**। पुणे । प्रतिनिधी ।**

**लोकसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला जागा दाखवून दिली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत पूर्ण बहुमताने महाविकास आघाडी सत्ता स्थापन करेल, असा दावा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडी एकदिलाने लढणार असून, राज्यातील जनतेला पर्याय उपलब्ध करुन दिला जाईल, असा विश्‍वासही पवारांनी व्यक्त केला.**



तांबडेमळा-मंचर आंबेगाव येथे शनिवारी (दि.२०) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्यावतीने आयोजित केलेल्या जनता दरबारात पवार बोलत होते. महायुतीच्या सरकारने सत्तेचा वापर ठराविक लोकांच्या फायद्यासाठी व काही जणांना जाणीवपूर्वक त्रास देण्यासाठी केला. शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांच्या विरोधात काम केले. महायुती सरकार जनतेचे प्रश्न सोडवत नसल्याचा आरोप पवारांनी केला.

शिवसेना (यूबीटी), राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) आणि काँग्रेस आणि आघाडीतील मित्रपक्षांमध्ये वर्चस्वाचा प्रश्नच येत नाही, असे पवार म्हणाले. यावेळी त्यांनी शेतकरी व तरुणांचे रोजगाराचे प्रश्न आपल्याला सोडवायचे आहेत. त्यासाठी कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांना जागृत करण्याचे काम करावे. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच सर्वांची साथ भक्कम राहू द्या, राज्यातील प्रत्येक जागा जिंकायच्या आहेत, देशात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकाचे आपल्या सर्वांना करायचे आहे, त्या दृष्टीने कामाला लागा, अशा सूचना कार्यकर्त्यांना दिल्या.

यावेळी पुणे पान २ वर

# भिसे खिंडीत दरड कोसळली

## वाहतूक काही काळ ठप्प

**। सुकेळी । वार्ताहर ।**



दोन ते तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नागोठणे-रोहा मार्गावरील भिसे खिंडीमध्ये शनिवारी (दि. २०) पहाटे ६.३० वाजण्याच्या सुमारास दरड कोसळण्याची घटना घडली. सुदैवाने पहाटेच्या वेळेत या मार्गावर वाहतूक कमी असल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. मात्र, काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी त्या ठिकाणी दाखल झाले व तात्काळ दरड हटविण्याचे काम सुरु करण्यात आले. त्यानंतर वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करण्यात आला.

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे अनेक नद्यांना पूर आला असून, सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळण्याचे प्रमाणदेखील वाढले असून, शनिवारी (दि.२०) सकाळी नागोठणे-रोहा मार्गावरील भिसे खिंडीमध्ये रोहा बाजूकडील खिंड सुरु होण्याच्या पहिल्याच वळणावर दरड कोसळून भले मोठे दगड व माती पान २ वर




# ट्रक-टेम्पोचा भीषण अपघात

## एक ठार, एक जखमी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोने एका ट्रकला जोरदार धडक दिली. यामध्ये दोन्ही वाहनांनी पेट घेतला. शनिवारी (दि. २०) पहाटे झालेल्या या दुर्घटनेत टेम्पोचालकाचा आगीत होरपळून जागीच मृत्यू झाला. तर, एक जण जखमी आहे. जखमीला उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

खालापूर तालुक्यातील फुडमॉलजवळ मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर ही दुर्घटना घडली. तीव्र उतारावर कोंबडी वाहतूक करणारा टेम्पो साखरेची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर जाऊन धडकला. या धडकेमुळे दोन्ही वाहनांना आग लागली. या भीषण अपघातात कोंबडी वाहतूक करणाऱ्या टेम्पो चालकाचा जागीच जळून मृत्यू झाला. तर, मोहम्मद सलमान (२४) हा गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी पान २ वर






# काळुंद्रे नदीचा रुद्रावतार, नांदगाव पुलावर पाणी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

शनिवारी (दि. २०) सुरु असलेल्या संततधार पावसामुळे तालुक्यातील अनेक भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या आहे. जुन्या मुंबई-पनवेल महामार्गावरून नांदगाव गावात जाणाऱ्या पुलावरूनही काळुंद्रे नदीचे पाणी गेल्याने या पुलावरून गावात जाणारी वाहतूक काही काळ खंडित झाली होती. तसेच गावाचा संपर्कदेखील तुटला आहे.

### गावाचा संपर्क तुटला

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर ओएनजीसी कंपनीजवळ कोकण रेल्वेच्या पुलाखाली पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी पान २ वर

# 'लाडकी बहीण' सरकारचा डाव

## मनोज जरांगेंचे टीकास्त्र

**जालना** : लाडकी बहीण, लाडका भाऊ योजना म्हणजे सरकारचा मत मिळवण्याचा डाव आहे, अशी टीका मराठा नेते मनोज जरांगे यांनी केली. जरांगेंनी अंतरवाली सराटीतून शनिवारपासून सरकारविरोधात पुन्हा एकदा राज्य सरकारविरोधात आमरण उपोषण सुरु केले आहे. यावेळी त्यांनी सरकारवर गंभीर आरोप केले.ते म्हणाले, तुम्हाला मराठा आरक्षण द्यायचे नाही. धनगरांना आरक्षण द्यायचे नाही. मुस्लिमांना द्यायचे नाही. तुम्हाला दलितांना न्याय द्यायचा नाही. पान २ वर



# स्थानकांमध्ये गळती, प्रवाशांवर जलाभिषेक

## उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व राजणपाडा रेल्वे स्थानकांचे काम निकृष्ट दर्जाचे

**। उरण । वार्ताहर ।**

नवी मुंबई शहराला जोडणार्‍या खारकोपर ते उरण अशा रेल्वे मार्गाची उभारणी ही सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च करून रेल्वे व सिडकोच्या माध्यमातून करण्यात आली आहे. परंतु, या रेल्वे मार्गावरील उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व रांजणपाडा या चार रेल्वे स्थानकांचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने पावसाळ्यात गळती लागल्याने प्रवाशांवर जलाभिषेक होत आहे. तसेच फरशीवर पाय घसरून एखाद्याला दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी, सदर कामांची चौकशी करावी, अशी



मागणी जोर धरू लागली आहे.

मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर उरण हा विकसनशील तालुका आहे. उरण तालुक्याला प्रवासी रेल्वे मार्गाने जोडण्यासाठी रेल्वे व सिडको प्रशासनाने सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च करून खार कोपर ते उरण अशा प्रकारचा प्रवाशी रेल्वे प्रकल्प हाती घेतला. या प्रवासी रेल्वे प्रकल्पात उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा, रांजणपाडा व गव्हाण ही महत्त्वाची रेल्वे स्थानके आहेत. त्यातील गव्हाण रेल्वे स्थानकांचे काम अपूर्ण असून, उर्वरित चार रेल्वे स्थानकांची कामे मार्गी लागली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात खार कोपर ते उरण या प्रवासी रेल्वे प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मार्च २०२४ मध्ये पार पडला. मात्र, घाईगडबडीत उरकण्यात आलेल्या उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व राजणपाडा या चार रेल्वे स्थानकांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने सध्या बांधकाम ढासळू लागून फरशा उखडत असून, आरसीसीच्या स्लॅबला, पत्रा शेडला पाण्याची गळती लागली आहे. पावसाळ्यातील पाणी फरशांवर पसरत असल्याने पाय घसरून एखाद्याला दुखापत होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे.त्यात स्थानक परिसराची, शौचालयाची स्वच्छता वेळच्या वेळी होत नसल्याने सदर रेल्वे स्थानकांना बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे.

> उरण तालुक्यातील प्रवासी रेल्वे स्थानकांची कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहेत. तसेच या परिसरातील स्वच्छता करण्यासाठी आजतागायत कामगारांची नियुक्ती न केल्याने स्थानकात घाणीचे साम्राज्य पसरत आहे.
> – बळराम मिना, रेल्वे स्थानक व्यवस्थापन अधिकारी

> उरणकरांना सुखद रेल्वे प्रवास व्हावा यासाठी गेली ५० वर्षे वाट पाहावी लागली आहे. परंतु, रेल्वे व सिडको प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे व भ्रष्ट कारभारामुळे आज उरणच्या रेल्वे स्थानकाच्या अंडरग्राऊंडमध्ये पावसाचे पाणी साचते, तसेच उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा व राजणपाडा रेल्वे स्थानकांची अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे झाली असून, पावसाळ्यात गळती लागली आहे. तरी, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सदर भ्रष्ट कारभाराची चौकशी करावी.
> – प्रगती पाटील, एक प्रवासी

# स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा उत्सव

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथे स्वामी समर्थ मठात रविवारी (दि. २१ जुलै) गुरुपौर्णिमा उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मठाधिपती सुधाकर घरत, अवधूत घरत, श्री स्वामी समर्थ सेवक व भक्त परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे. भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था आगरी समाज हॉल येथे करण्यात आली आहे.

यावेळी पहाटे ५.३० वाजता श्रींची काकड आरती, सकाळी ७.३० वाजता नित्य नैमित्तीक पूजा प्रसाद, सकाळी ८.३० वाजता लघुरुद्र पूजा, दुपारी १२ वाजता श्रींची आरती व प्रसाद, दुपारी १२.३० वाजता श्री दत्तगायत्री होमहवन, दुपारी १ वाजता श्री सद्गुरु पाद्यपूजा, सायंकाळी ४ वाजता श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन, सायंकाळी ५ वा. गुरुवर्य सुधाकर घरत यांचे प्रवचन, सायंकाळी ६.३० वा. स्वामींची महाआरती, रात्री ७.३० वा. महाप्रसाद, रात्री ८ वा. गुरूमंत्र प्रदान व रात्री ११ वा. श्री स्वामी समर्थ भजन मंडळाच्या भजनाने उत्सवाची सांगता होईल.

# चौल दत्तमंदिरात गुरुपौर्णिमेचा उत्सव

## नवनाथ आरती मंडळाकडून विविध कार्यक्रम

**। चौल । प्रतिनिधी ।**

चौल-भोवाळे येथील पर्वतनिवास दत्तमंदिरात रविवार, दि. २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती नवनाथ आरती मंडळाकडून देण्यात आली.




चौल येथील दत्त मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमेनिमित्त उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त दत्तमंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली असून, रंगीबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली आहे. गुरुपौर्णिमेच्या उत्सव सोहळ्यास पहाटे पाच वाजल्यापासून प्रारंभ होणार आहे. पहाटे दत्तमहाराजांना अभ्यंगस्नान घालण्यात येणार आहे. त्यानंतर काकडी आरती झाल्यावर मंदिर दत्तगुरुंच्या दर्शनासाठी खुले होईल. दुपारी बारा वाजल्यापासून रात्री नऊ वाजेपर्यंत दर्शनासाठी येणार्‍या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सायंकाळी साडेसहा वाजता पादुका स्नान, पूजन आणि त्यानंतर आरती होईल. या कार्यक्रमासाठी दतमंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे, आरती मंडळाचे आशिष वासुदेव, सचिन राऊत, निकेश घरत यांच्यासह सर्व दत्त भक्तांचे विशेष सहकार्य लाभले आहे. दरवर्षी गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटेपासून रात्रीपर्यंत दत्तमहाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. दरम्यान, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरव प्रभाकर आगलावे यांच्यासह सर्व दत्तभक्त मेहनत घेत आहेत.

# चिरनेरच्या इंग्रजी माध्यम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**। चिरनेर । वार्ताहर ।**

चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यम स्कूलमध्ये शनिवारी (दि. २०) गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी वक्तृत्व आणि नृत्याचे प्रकार सादर केले. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धाही यावेळी घेण्यात आल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचे चरण स्पर्श करीत आशीर्वाद घेतले.

दरम्यान, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे यांनी पूर्वीच्या काळी शिष्य हे ज्ञान घेण्यासाठी गुरूंकडे आश्रमात राहात असत. ज्ञानप्राप्तीनंतर गुरुला गुरुदक्षिणा देण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी केली जात असे. आता मात्र गुरुकुल परंपरा कमी झाली आहे. मात्र, गुरूंकडून ज्ञान घेण्याची प्रथा आजही तशीच आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवाप्रमाणे



मानले जाते. आणि म्हणून आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून सांगितले.

यावेळी पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या सुनिता खारपाटील, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मुख्याध्यापिका मंदा घरत, मुख्याध्यापिका स्मिता मसुरकर तसेच शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सर्वसामान्यांना मिळाले हक्काचे घर

## सिडकोच्या ३३२२ सदनिकांची सोडत जाहीर

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ करिता संगणकीय सोडत १९ जुलै रोजी सिडको भवन येथील सिडको सभागृहामध्ये यशस्वीरित्या पार पडली. सिडकोतर्फे २६ जानेवारी रोजी या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन नवी मुंबईतील तळोजा आणि द्रोणागिरी नोड येथे परवडणार्‍या दरातील ३३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

याप्रसंगी महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ मध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांचे सिडकोचे उपाध्यक्षतथाव्यवस्थापकीयसंचालक विजय सिंघल यांनी अभिनंदन केले. सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे पर्यवेक्षक म्हणून मोईझ हुसेन आणि अर्जदारांपैकी तीन अर्जदार हे पंच म्हणून उपस्थित होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी



परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

सिडकोतर्फे वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा आणि द्रोणागिरी नोडमध्ये ३३२२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण गटातील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तळोजा या नोडला सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. द्रोणागिरी हा जेएनपीटी बंदरालगतचा नोड असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होत आहेत. द्रोणागिरी नोडला नेरूळ-उरण रेल्वेद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून द्रोणागिरी नोड हा नजीकच्या अंतरावर आहे. महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ च्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम लवकरात लवकर परत केली जाईल, असे जाहीर करण्यात आले.

# नेने महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिटतर्फे कॉलेजच्या क्रीडांगणाच्या परिसरात शनिवारी (दि.२०) वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या मेनन मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. तुकाराम माळवे, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक डॉ. सुभाष




लकडे तसेच वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका व कार्यक्रम समन्वयक महिला कार्यक्रम अधिकारी सायली पितळे आणि वैदेही जोशी यांनी केले.


याप्रसंगी भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या क्रीडांगणाच्या परिसरात विविध प्रकारची फळझाडे तसेच इतर वृक्ष लावण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पर्यावरण समतोल, तसेच वृक्षारोपण व संवर्धन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

# सुधागडमध्ये पावसाळी पर्यटन बहरले

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

**जिल्ह्यातील काही ठिकाणे व धबधबे धोकादायक म्हणून तेथे पर्यटनासाठी शासनाने बंदी आणली आहे. मात्र, सुधागड तालुक्यातील विविध ठिकाणी असलेले सुरक्षित पांढरे शुभ्र धबधबे, नदी, नाले, धरणांचे ओव्हरफ्लो होणारे पाणी जिल्ह्यासह इतर ठिकाणच्या पर्यटकांना आकर्षित करत आहे. त्यामुळे पावसाळी पर्यटनासाठी ही पर्यटकांना जणू काही पर्वणीच आहे.**

पिलोसरी येथील घपकी गाव, उद्धर, सिद्धेश्वर, भावशेत, आपटवणे, नाडसूर व पडसरे येथील धबधबे पर्यटकांनी गजबजलेले असतात. तसेच उन्हेरे व कोंडगाव येथील धरणांच्या ओसंडून वाहणार्‍या पाण्यात मौजमजा घेण्यासाठी पर्यटक येथे गर्दी करत आहेत. शनिवारी व रविवारी व सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे येत असतात. थोडी खबरदारी व अतिउत्साह टाळल्यास शाळकरी, लहान मुले, महिला व तरुणांसाठी ही ठिकाणे सुरक्षित आहेत. त्यामुळे इतर तालुक्यातील व पुणे मुंबई आदी शहरातील पर्यटकदेखील येथे आवर्जुन येत असतात. त्यामुळे येथील छोटे हॉटेल व्यावसायिक व हातगाडीवाल्यांच्या उत्पन्नात भर पडते. मात्र, गर्दीच्या दिवशी येथे पोलीस तैनात ठेवण्यात यावेत, अशी मागणी काही नागरिकांनी केली आहे.



पान १ वरून

## पवारांचा प्लॅन ठरला

जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, भीमाशंकर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, शेखर पाचुंदकर बाळासाहेब बाणखेले, सदाशिव थिटे उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील १६ पंचायत समिती गणातील प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधून निवडणूक प्रचाराची पेरणी सुरु केली.

## ट्रक-टेम्पोचा भीषण अपघात, एक ठार

पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.टेम्पो चालकाचा डुलकी लागल्याने हा अपघात झाला असावा, असाप्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच आयआरबी, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, खोपोली अग्नीशमन दल आणि अपघातग्रस्तांच्या मदतीला या सामाजिक संस्थेची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी जखमीसह मृत टेम्पोचालकाचा मृतदेह बाहेर काढला. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक पूर्ववत केली.

## काळुंद्रे नदीचा रुद्रावतार, नांदगाव पुलावर पाणी

होते. पुणे आणि मुंबईच्या दिशेने वाहनांच्या रांगा लागत असल्यामुळे दोन मिनिटांचे अंतर कापण्यासाठी तासभर किंवा त्याहीपेक्षा जास्त वेळ वाहनचालक, प्रवासी ताटकळत असतात. यामुळे अनेकदा वाहनचालक नांदगावमार्गे पळस्पेला जाणार्‍या रस्त्याचा वापर करत असतात. पनवेलवरून भिंगारी गावाजवळ उजवीकडे वळून नांदगावला जाण्याचा रस्ता आहे. येथे नदी ओलांडण्यासाठी जिल्हा परिषदेने बांधलेला कलव्हर्ट प्रकारचा अतिशय कमी उंचाची पूल आहे. एरवी फक्त नांदगावातील नागरिकांसाठी वापरला जाणारा हा रस्ता महामार्गावरील कोंडीमुळे वापरात आला आहे. काळुंद्रे नदीवरील या पुलावरून पाणी गेल्याने या ठिकाणची वाहतूक खंडित होऊन वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला आहे.

**कोळवडी गावातदेखील पाणी**

तालुक्यातील कोलवडी गावातदेखील पावसामुळे पाणी तुंबल्याचे पाहायला मिळाले. पावसाळी नाल्यातील पाणी गावातील रस्त्यावर आल्याने गावातील रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

**वावंजे गावातील रस्त्यावर पाणी**

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातील वावंजे गावाला जोडणार्‍या मार्गांवरदेखील मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे पाहायला मिळाले.

## ‘लाडकी बहीण’ सरकारचा डाव

आता लाडका भाऊ, लाडकी बहीण योजना आणली आहे. तुम्हाला आम्हा सर्वांना येड्यात काढायचं आहे का? आता लाडकी मेहुणा किंवा मेहुणी योजना आणतील. तुम्हाला हेच करायचं आहे का? असा सवाल जरांगेंनी केला आहे. तुम्हाला असले लफडे करायचे आहेत का? निवडणुकीच्या तोंडावर पैसे वाटायचे, निवडणुका संपल्या ही हे सर्व बंद पडणार. लोकांना रांगेत उभे केले जात आहे. रांगेत उभे केल्यानं काय होतं तुम्हाला माहिती आहे ना. गोरगरिबांना लक्षात येत नाही. त्यांना वाटतं सरकारने लाडकी योजना आणली. सरकार चांगलं आहे. त्यामुळे ते लढा विसरतात. या नादात रांग लागल्यामुळे तिथे लाडकी बहीण गेली, भाऊ गेला अन् आता लाडका भाऊदेखील जाईल, असं जरांगे म्हणालेत. लाडकी बहीण योजनेमुळे साईट बंद पडल्यात. आपल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येत नाहीये. सरकार बधिर झालं आहे का? लाडकी बहीण योजनेमुळे साईटवर लोड आलाय. मेहुणीचे भरायचे की मेहुण्याचे फॉर्म भरायचे. सरकारने हा डाव टाकला आहे. बारा बलुतेदारांनी समजून घ्या. लाडकी बहीण योजनेमुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास अडचणी येत आहेत. गर्दी झाल्यामुळे साईटच बंद झाली आहे, असा दावा जरांगेंनी केला आहे.

सरकारने विद्यार्थ्यांचे वाटोळं केलं. सरकारनं चांगलंच काम केलं असेल, माझा त्याला विरोध नाही. पण, पैसे दिले म्हणजे एकप्रकारचे तुम्ही मतदार विकत घेतले आहेत. एका खासदारानेदेखील अशी आयडिया केली होती. मी नाव सांगणार नाही. ती महिला होती. साडी आणि मंगळसूत्र वाटायला सुरुवात केली होती. पण, निवडणुकीत तिचा पराभव झाला. लोकांनी शहाणे व्हावं, हे लोक खूप चालू आहेत, असं जरांगे म्हणाले

## ... दरड कोसळली

रस्त्यावर आली होती. त्यामुळे वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. दरड कोसळण्याची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. तात्काळ जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर आलेल्या झाडांची छाटणी करुन दगड माती बाजूला करुन रस्ता पूर्ववत करुन वाहतूक सुरळीत सुरू केली. यावेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, रोहा पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनीदेखील दरडग्रस्त ठिकाणची प्रत्यक्षात पाहणी केली.दरम्यान, दरवर्षी रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. यासाठी पावसाळ्याच्या आधीच दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे होते. म्हणजेच, दरड कोसळण्याची शक्यता असणार्‍या ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्याचे गरजेचे असतानासुद्धा याबाबतीत बांधकाम विभागाचे कुठेतरी दुर्लक्ष केले असल्यामुळेच अशा घटना या वारंवार घडत आहेत, अशी प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

# स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

**। तळा । वार्ताहर ।**

द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने श्रीकृष्ण देशमुख यांच्या स्मृतिपित्यर्थ प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत सोहळा व स्पर्धा परीक्षा केंद्र आणि संशोधन केंद्राचे उद्घाटन तळा तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन डॉ. श्रीनिवास वेदक होते.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेश देशमुख, विश्वस्त मारुती शिर्के तसेच गो.म वेदक प्रशालेचे चेअरमन महेंद्र कजबजे इत्यादी मान्यवर हजर होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भगवान लोखंडे यांनी केले, तर




सूत्रसंचालन डॉ. तृप्ती थोरात यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बोलताना तहसीलदार स्वाती पाटील यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी मुलांनी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. तर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी महाविद्यालयामध्ये संशोधन केंद्र सुरू होत आहे याविषयीचे समाधान व्यक्त करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या केंद्रामार्फत संशोधन करता येईल, असा आशावाद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. राजाराम थोरात यांनी केले. या कार्यक्रमप्रसंगी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**हमरापूर :** बँक ऑफ बडौदा शाखा पिरकोन यांच्यातर्फे बँकेच्या ११७ स्थापना दिवस समारोह सी.एस.आर. ॲक्टिव्हिटी कार्यक्रमातंर्गत पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन रायगड जिल्हा परिषद शाळा पालेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता म्हात्रे, बँकेचे मॅनेजर व्यंकटेश ओडी, गोपाल सर, निलेश पाटील, विजय पाटील, अमोल सर, बल्लाल मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

# कोमसापतर्फे ऑनलाईन कविसंमेलन

**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या तळा शाखेतर्फे आषाढी एकादशीनिमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन कविसंमेलन संपन्न झाले.

प्रास्ताविकात कोमसाप तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी उपस्थित कवींचे स्वागत केले. या कविसंमेलनात पंढरीची वारी, माझा देव व विठ्ठल भक्ती या विषयावर २१ कवींनी आपल्या स्वरचित उत्तम रचना सादर केल्या. अध्यक्षीय भाषणात रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांनी यांनी कविता सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. या कविसंमेलनात नारायण पानावकर, किरण केळुसकर, शिल्पा मोहिते, मंदाकिनी हांडे, प्रतीक्षा नगरकर, रघुनाथ पोवार, उषा खोत, संजय होळकर, नैनिता कर्णिक, प्रज्ञा मराठे, सिद्धेश लखमदे, अनिता कांबळे, सत्यवान घाडी, प्रज्ञा म्हात्रे, संजना जुवाटकर, अजित शेडगे, संगीता नाचपल्ले यांनी कवितांच्या माध्यमातून विठुरायाच्या नामाचा गजर केला. या कविसंमेलनाचे आभार प्रणय इंगळे यांनी मानले.

निवडक

## रेल्वेमंत्र्यांना प्रवाशांचे साकडे

**नेरळ :** पुणे-मुंबई मागार्वर असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे रेल्वे मार्गाने प्रवास करून जात आहेत. ते कर्जत स्थानकात आले असता कोरोना काळात बंद करण्यात आलेले एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पुन्हा सुरु करावेत आणि पनवेल-कर्जत मार्गावरील हालिवली सरपंच प्रमिला बोराडे यांनी देखील नवीन मार्गवरील बोगद्यामुळे स्थानिकांच्या घरांचे नुकसान होत असून यांची भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. तर, बोराडे यांनी या मागणीसाठी आतापर्यंत तीनवेळा उपोषणे केले आहे.

## पनवेलमध्ये दुचाकीची चोरी

**पनवेल :** विहिघर गाव येथील यदानिश पठाण यांनी आपल्या जवळील स्कुटी (एमएच-४६-सीजे-२०३६) कामोठे येथे घेऊन गेले होते. तेथील काम आटपून ते सुकापुर येथील राम मंदिराच्या बाजूला स्कुटी उभी करून ठेवली होती. बॅग स्कुटीला अडकवून ते शॉपिंग करायला गेले होते. शॉपिंग करून परतल्यावर स्कुटी पार्क केलेल्या ठिकाणी गेले असता स्कुटी दिसून आली नाही. तिचा आजूबाजूला शोध घेतला, मात्र सापडली नाही. स्कुटी चोरीला गेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विल्फ्रेड सोसायटीला दंड

**पनवेल :** गौण खनिज बेकायदा उत्खनन प्रकरणी तालुक्यातील सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी शेडुंग यांना अप्पर तहसीलदार यांनी ३ लाख ५ हजार ५८० रुपयांचा दंड ठोठावला आहे. शेडुंग येथील जमीन मिळकतीमध्ये ९६६ ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याची तक्रार पनवेल तहसील कार्यालयात करण्यात आली होती. त्यानुसार ९०० ब्रास गौण खनिजाच्या पावत्या सादर करण्यात आल्या. मात्र, ६६ ब्रास अनधिकृत उत्खनन केल्याचे दिसून आले. यामुळे हा दंड ठोठावण्यात आला आहे.

## महिलेचा आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. या महिलेचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व पांढरे लांब, उंची अंदाजे ५ फुट, दोन पायाच्या अंगठ्यामध्ये तांब्याचे जोडवे परिधान केलेले आहे. तसेच, उजव्या हातामध्ये तांब्याचे कडे आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल पनवेल शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक उध्दव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा.

## अज्ञात इसमाचा मृतदेह

**खांब :** पनवेल : पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फुट ५ इंच, अंगाने सडपातळ, केस काळे व मोठे, तसेच दाढी मिशी वाढलेली असून अंगात भगव्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा.

# ग्रामपंचायत कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

**प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष असल्याचा आरोप**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी गेल्या अनेक वर्षापासून रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्यावतीने सरकारला निवेदने दिली आहेत. मोर्चे बैठकांच्या माध्यमातून चर्चा केली आहे. परंतु, सरकारने याकडे दुर्लक्ष केल्याने या कर्मचाऱ्यांनी आक्रमक भुमिका घेतली आहे. येत्या ९ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा परिषदेवर ग्रामपंचायत कर्मचारी मोर्चा काढणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.**




रायगड जिल्ह्यामध्ये ८१० ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या साधारणतः एक हजारहून अधिक आहे. हे कर्मचारी घरपट्टी, पाणीपट्टी वसूल करणे, कार्यालयासह परिसराची स्वच्छता राखणे, पाणी पुरवठा करणे, जलसुरक्षा रक्षक, केंद्रस्तरिय अधिकारी म्हणून काम करणे, आपत्कालीन परिस्थितीत रात्रीचा दिवस करून मदतीसाठी धावणे, शासनाच्या वेगवेगळ्या योजना जनतेपर्यंत पोहचविणे अशा अनेक प्रकारची कामे हे कर्मचारी करत असतात. तुटपुंज्या मानधनावर हे कर्मचारी कामे करत आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी रायगड जिल्हा कर्मचारी संघटना गेल्या अनेक वर्षापासून सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु, सरकारकडून फक्त आश्वासने दिली जात आहेत. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप कर्मचारी संघटनेने केला आहे.

सेवानिवृत्तीचे वय निश्चित करा, सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करा, किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी न देणाऱ्या ग्रामपंचायतीवर कारवाई करण्यात यावी, भरती करताना संघटनेला विश्वासात घेऊन करावी, अशा अनेक मागण्या असून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने येत्या ९ ऑगस्ट रोजी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. मारूती नाका ते जिल्हा परिषद कार्यालय असा हा मोर्चा निघणार आहे.

### दोन वर्षाचे वेतन थकले

**रायगड जिल्हयातील उरण, घोसाळा, रेवदंडा, चणेरा येथे काम करणाऱ्या चार कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे. प्रशासन प्रस्ताव पुर्ण करण्यास अपयशी ठरल्याने २०२१ पासून हे चार कर्मचारी वेतनापासून वंचित राहिले आहेत. लाल फितीत अडकलेल्या प्रस्तावाचा फटका या कर्मचाऱ्यांना बसत असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे.**

### मदतीचा प्रस्ताव धूळ खात

**रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमधील सहा कर्मचाऱ्यांचे कोरोनामुळे निधन झाले. या चारपैकी दोन कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना शासनाकडून अद्यापर्यंत मदतीचा हात देण्यात आला नाही. त्याचा प्रस्ताव अजूनही जिल्हा परिषदेच्या कार्यालयात धुळ खात पडून आहे. परंतु, त्याची पुर्तता करण्यास प्रशासन अपयशी ठरल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे.**

## तिघांविरोधात गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

तालुक्यातील खानावळे येथील किरण लबडे यांची निकुज शहा व आयुष मोटा यांच्यासोबत मैत्रीचे संबंध निर्माण झाले होते. मार्च महिन्यात निकुज शहा याने फोन करून नातेवाईक आजारी असल्याने वडिलांना गुजरात येथे जायचे आहे, त्यासाठी किरण लबडे यांच्याकडे कारची मागणी केली होती. यानंतर निकुजचे वडील प्रफुल्ल शहा यांनी फोनवर दहा दिवसांनी गावावरून परत आल्यावर गाडी परत देऊ असे सांगितले. निकुज शहा आणि आयुष मोटा कार घेऊन गेले. त्यांना एप्रिल महिन्यात फोन केला असता चार-पाच दिवसात येतो असे सांगितले होते. मात्र, कार परत आणली नाही. निकुज यांच्या वडिलांना फोन करून विचारणा केली असता कार ३ लाख रुपयांमध्ये गहाण ठेवली असल्याचे सांगण्यात आले. यामुळे किरण लबडे यांनी निकुज शहा, प्रफुल शहा आणि आयुष मोटा यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## वीज संघर्ष समितीचा कार्यालयावर मूक मोर्चा




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वाढीव वीज बिले, सतत खंडित होणारा वीज पुरवठा यामुळे कर्जत तालुक्यातील वीज ग्राहक त्रस्त झाला आहे. यामुळे वीज संघर्ष समितीच्या माध्यमातून कर्जत महावितरण कार्यालयावर आयोजित केलेल्या मुक मोर्चाला तालुक्यातील जनतेने अभूतपूर्व पाठिंबा दिला. या मोर्चामध्ये संतप्त ग्राहकांची शेकडो ने उपस्थिती असल्याने मुक मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे थांबविण्यात आला.

या मुक मोर्चातील सहभागी सात महिला पदाधिकारी ॲड. भावना पवार, सुनिता जाधव, सुषमा लाड, दिपाली पिंगळे, भारती कांबळे, मनीषा गायकवाड, सुजाता भानुसघरे, शर्वरी कांबळे, शुभांगी गायकवाड यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता एम.के. माने आणि उप अभियंता प्रकाश देवके यांच्याकडे निवेदन सादर केले असून महवितरण कंपनीकडून सर्व विषय मार्गी लावण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती दिली. त्याचवेळी महावितरण कंपनीकडून समस्यांचे निराकरण होत नाही तोवर आंदोलन सुरूच राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, मुक मोर्चानंतर १ ऑगस्ट पासून महावितरण कंपनीचे विरोधात साखळी उपोषण आणि १५ ऑगस्ट पासून प्राणांतिक उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## द्रुतगती महामार्गावर फक्त सहा पोलीस

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शिवकर परिसरात सोमवारी रात्री झालेल्या भीषण अपघातामुळे सरकारी यंत्रणेतील काही त्रुटी उघड झाल्या आहेत. यात आषाढी वारीसाठी भाविकांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर द्रुतगती मार्गावर आल्यावरून शंका उपस्थित केल्या जात आहेत. तर, या मार्गावरील ४४ किलोमीटरच्या टप्प्यात महामार्ग वाहतूक पोलीस विभागाचे अवघे सहा कर्मचारी मध्यरात्री गस्तीवर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सोमवारी मध्यरात्री सुमारे ४४ किलोमीटरच्या द्रुतगती मार्गावरील गस्तीसाठी सहाच पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सहापैकी चार पोलीस कर्मचारी वाहन गस्तीवर होते. तर, अन्य दोन जण पोलीस नियंत्रण कक्षात होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. द्रुतगती मार्गावर प्रतिबंधित वाहन रोखण्यासाठी कोणतीही यंत्रणा महामार्ग पोलिसांकडे उपलब्ध नव्हती, असे चौकशीअंती स्पष्ट झाले.

## जयंत पाटील यांच्याकडून सांत्वन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा नेते तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे यांच्या मातोश्री फसाबाई डामसे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी कर्जत कोठिंबे येथे जाऊन डामसे कुटुंबियांचे सांत्वन केले.

नारायण डामसे हे शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते समजले जातात. कोठिंबे येथील डामसे यांच्या निवासस्थानी जाऊन जयंत पाटील यांनी सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासमवेत तालुका चिटणीस श्रीराम राणे, रायगड जिल्हा बँकेचे संचालक तानाजी मते, माजी संचालक आणि कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष प्रकाश फराट, माजी सभापती गजानन पेमारे, युवक तालुकाध्यक्ष महेश म्हसे, विभाग चिटणीस पांडुरंग बदे, मंगेश खडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## चित्रलेखा पाटील यांच्याकडून सांत्वन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील चिंचोटी येथील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ निष्ठावंत कार्यकर्ते बाळाराम केशव पाटील यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी शुक्रवारी (दि.१९) पाटील यांच्या कुटूंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

बाळाराम पाटील यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी शुक्रवारी चिंचोटी येथील पाटील यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटूंबियांची विचारपूस केली. त्यांचे सांत्वन केले. यावेळी माजी सरपंच मोहन धुमाळ, देवायनी पाटील, संजय पाटील, महेश झावरे, नितीन झावरे, अक्षय डिकले, तसेच दिवंगत बाळाराम पाटील यांचे सुपूत्र हेमंत पाटील, योगेंद्र पाटील, जयेंद्र पाटील व पाटील कुटूंबिय उपस्थित होते.



## भेरव आंबा नदीच्या पुलाची डागडुजी

**। पाली । वार्ताहर ।**

खुरावले फाटा ते वाघोशी मार्गावर भेरव येथील आंबा नदीवरील पुलावर पडलेले महाकाय खड्डे अखेर भरण्यात आले आहेत. वाघोशी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच दिपक पवार यांच्या प्रयत्नांतून व वसुधा सोसायटीच्या सहकार्यातून हे महाकाय खड्डे भरण्यात आले आहेत.

आंबा नदीच्या पुलाच्या दोन्ही बाजूस रस्त्याला मोठं मोठे खड्डे पडले होते. वाहनचालकांना वाहने चालविताना अडचणी येत होत्या. तसेच, पुलावर देखील खड्डे असल्याने रस्ता अरुंद झाला होता. यामुळे वाहनचालकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत होती. तसेच, पुलावरील खड्ड्यांतून लोखंडी सळ्या निघाल्या असल्याने वाहनांच्या टायर मध्ये घुसून टायर फुटण्याचा धोका निर्माण झाला होता. या सर्व अडचणी लक्षात घेत दिपक पवार यांनी याबाबत वसुधा सोसायटीच्या व्यवस्थापनासोबत चर्चा करुन ते खड्डे भरण्याची मागणी केली होती.

या मागणीला वसुधा सोसायटीकडून हिरवा कंदील दाखवित खड्डे भरण्यासाठी लागणारे मटेरियल व खड्डे भरण्यासाठी कर्मचारी देण्याची तयारी दर्शविली. खड्डे भरतेवेळी दिपक पवार, शरद चोरघे, अभियंता संकेत, प्रकाश मोकल, जगन्नाथ देशमुख आदी उपस्थित होते.

## नवीन शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेजचा प्रवेशोत्सव सुरु

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने दि. १५ जुलैच्या शासन निर्णयाद्वारे ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेस येथे बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स या नावाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उरण तालुक्यामधील ग्रामीण भागातील हे पहिले महाविद्यालय असून यामध्ये बॅचलर ऑफ आर्ट्स, बॅचलर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ सायन्स आणि बॅचलर ऑफ सायन्स (आय.टी.) या चार विद्याशाखांतून पदवीपर्यंतचे शिक्षण घेण्याची सुविधा विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. या महाविद्यालयाच्या प्रवेशोत्सवाचा शुभारंभ नुकताच संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या खजिनदार प्राचार्य डॉ. सुखदा चिराटे, विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे, विश्वस्त मेघा म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनि. कॉलेजचे प्राचार्य सुभाष ठाकूर, माजी वन विभाग अधिकारी महादेव गावंड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, 'वारी शिक्षणाची', 'प्रवेशोत्सव पदवीचा' या संकल्पनेवर आधारित दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाळासाहेब म्हात्रे यांच्या नावाने ग्रामीण भागात सुरु झालेल्या आणि प्रशस्त इमारत व सर्व सोयी-सुविधांनी युक्त असणाऱ्या या महाविद्यालयामध्ये गरीब, कष्टकरी व शेतकरी कुटुंबातील होतकरू विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून त्याचा जास्तीत जास्त युवक-युवतींनी या महाविद्यालयात प्रवेश घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी केले आहे आणि महाविद्यालयास मंजुरी मिळण्यासाठी झटणाऱ्या सर्व समाजघटकांचे त्यांनी आभार मानले आहेत.



## म्हसळ्यातील महिला लातूरला सापडली

**। म्हसळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील पांगळोली गावातील एक मुस्लीम विवाहिता दोन मुलांसह बेपत्ता झाल्याची तक्रार म्हसळा पोलिसांकडे १४ जुलै रोजी आली होती. महिला अचानक गायब झाल्याने पोलिसांनी बराच शोध घेतला पण शोध लागला नाही. अखेर महिलेच्या मोबाईल लोकेशनवरून ट्रेस केले असता ती लातूरमध्ये असल्याचे कळले. यानंतर म्हसळा पोलिसांनी तातडीने महिला आणि मुलांना परत आणले. महिलेच्या घरातून निघून जाण्याचे कारण पोलिसांना कळले तेव्हा त्यांना धक्काच बसला. नवऱ्यासोबत सतत भांडण होत असल्यामुळे साबिरा पाल हिने आपल्या दोन मुलांसह घर सोडले, असे पोलिसांना सांगितले. म्हसळा तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे, हवालदार संतोष चव्हाण, पोलीस शिपाई समर्थ सांगळे, महिला पोलीस शिपाई सोनावणे यांच्या टीमने ही कामगिरी पूर्ण केली.

**प्रत्येक दिवस एक विशिष्ट उपक्रमाचा**

# रायगडात उद्यापासून शिक्षण सप्ताह

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच त्यांची बौध्दीक व शारिरीक क्षमता वाढविण्यासाठी शिक्षण विभागाने शिक्षण सप्ताहाचे आयोजन केले आहे. सोमवारी (दि.२२) ते रविवारी (दि.२८) जूलै या कालावधीत हा सप्ताह असणार आहे. या कालावधीत प्रत्येक दिवस विशिष्ट उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.**



अध्ययन व अध्यापन साहित्य दिवस, मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, क्रीडा दिवस, सांस्कृतिक दिवस, कौशल्य व डिजीटल उपक्रम दिवस, शालेय पोषण दिवस आणि समुदाय सहभाग दिवस असे वेगवेगळे उपक्रम प्रत्येक दिवशी घेतले जाणार आहेत. या आठ दिवसांमध्ये विविध शिक्षण शैली, पर्यावरण विषयक जागरुकता वाढविणे, सहयोगी शिक्षण कौशल्य वाढविणे, उच्च गुणवत्ता आणि विविध शिक्षण आणि शिकण्याची सामग्री विकसित करणे, खेळाडूवृत्ती, नैतिक वर्तणूक यातील सकारात्मक वृत्ती विकसीत करणे, शारीरिक, मानसिक सामाजिक व भावनिक दृष्ट्या योग्य होण्यासाठी प्रयत्न करणे, विविध कार्यक्रम घेणे, करिअरचे मार्ग शोधण्यासाठी प्रेरित करणे, डिजीटल शिक्षणाचे फायदे ओळखण्याची तयारी करणे हा उद्देश समोर ठेवून हा सप्ताह सुरु करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळांमध्ये हा सप्ताह राबविला जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

> **विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी शासनाने शिक्षण सप्ताहाचे आयोजन केले आहे. २२ ते २८ जूलै या कालावधीत हा सप्ताह असणार आहे. आठवडाभर विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौध्दीक व शारिरीक प्रगतीला गती देण्याचा प्रयत्न आहे.**
> **– कृष्णा पिंगळा, गटशिक्षणाधिकारी, अलिबाग**

## मुरुड मधील भात शेती पाण्याखाली

**। मुरूड-शहर । वार्ताहर ।**

तालुक्यात मुसळधार पाऊस पडत असून विभिन्न भागातील भात शेती पाण्याखाली गेल्याचे दिसून येत आहे. शुक्रवारी रात्री ८ पासून शनिवारी सकाळी ८ वाजेपर्यंत तालुक्यात १२ तासात ९५ मिमी पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत एकूण १८५५ मिमी पाऊस पडल्याची माहिती तहसील सूत्रांनी दिली. बेफाम पावसामुळे शिघ्रे, खारआंबोली परिसरात असलेली भात शेती जलमय झाली आहे. पारगानयेथील शेतकरी धर्माजी हिरवे यांची खारआंबोली-खतीबखार गावाजवळील भात शेती जलमय होऊन राब वाहून गेले आहेत. मुसळधार पाऊस दोन दिवसांपासून पडत असून दिवस-रात्र कोसळत आहे. यामुळे शिघ्रे, जोसतंजन, उंडरगाव, गोयगाव, वावडुंगी खारआंबोली, तेलवडे परिसरातील अनेक जणांची शेती पाण्याखाली गेली आहे.

# सुरक्षित धबधब्यांचे पर्यटकांना आकर्षण

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
**जिल्ह्यातील काही धबधबे व ठिकाणे धोकादायक म्हणून तेथे पर्यटनासाठी शासनाने बंदी आणली आहे. मात्र, सुधागड तालुक्यातील पांढरे शुभ्र धबधबे, धरणांचे ओव्हरफ्लो होणारे पाणी पर्यटकांना आकर्षित करत आहे. त्यामूळे सुरक्षित पावसाळी पर्यटनासाठी हि पर्यटकांना जणु काही पर्वणीच आहे.**



धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यापेक्षा सुरक्षित धबधबे, ओढे व धरणे येथे पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक पसंती देत आहेत. येथील पिलोसरी येथील घपकी गाव, उद्धर, सिद्धेश्वर, भावशेत, आपटवणे, नाडसूर व पडसरे येथील धबधबे पर्यटकांनी गजबजलेले आहेत. तसेच उन्हेरे, उद्धर व कोंडगाव येथील धरणांच्या ओसंडून वाहणाऱ्या पाण्यात मौजमजा घेण्यासाठी पर्यटक येथे गर्दी करत आहेत. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे मौजमजेसाठी येत असतात. थोडी खबरदारी व अतीउत्साह टाळल्यास शाळकरी, लहानमुले, महिला व तरुणांसाठी ही ठिकाणे सुरक्षित आहेत. त्यामूळे इतर तालुक्यातील पर्यटक देखिल येथे आवर्जुन येत असतात. त्यामूळे येथील छोटे हॉटेल व्यवसायिक व हातगाडीवाल्यांच्या उत्पन्नात भर पडते. मात्र, गर्दिच्या दिवशी येथे पोलीस तैनात ठेवण्यात यावेत, अशी मागणी काही नागरीकांनी केली आहे.

> **तालुक्यातील विविध ठिकाणचे धबधबे खुपच आकर्षक आहेत. दुरवर कोठेही पावसाळी पर्यटनासाठी जाण्यापेक्षा येथे जावून चिंब भिजण्याचा आनंद लोक घेतात. तसेच, निसर्गाशी एकरूप देखील होता येते. कुटूंबिय व महिलांसाठी देखिल हे धबधबे सुरक्षित आहेत. मात्र पर्यटकांनी अती उत्साह टाळावा व येथे कचरा करु नये.**
> **– दामोदर हुले, निसर्ग पर्यटक**

## नाटिकेला सर्वोत्तम पसंती

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**
शासनाने ग्रामीण भागात शिक्षणाचे महत्व कळावे व जास्तीती जास्त जनता साक्षर व्हावी, जीवनात वापरली जाणारी साधने त्यांना सुद्धा अगदी सहज वापरता यावी यासाठी नवभारत साक्षरता अभियान सुरु केले आहे. यावेळी या अभियान अंतर्गत नांदगाव हायस्कूलमध्ये जनजागृती होण्यासाठी नाटिका व पोवाड्यांचे आयोजन करण्यात आले होते. नाटिकेमध्ये शिक्षणाचे महत्व कसे महत्वाचे आहे, हे पटवून देण्यात आले. तसेच, शालेय विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात प्रचार व प्रसार करून शिक्षणाचे महत्व सुद्धा पटवून दिले. नांदगाव हायस्कूल ने सादर केलेल्या या जनगृती पथनाट्यास सर्वोत्तम पसंती मिळाली.

## प्रांजल जाधव यांची उपसरपंचपदी निवड



**। रसायनी । वार्ताहर ।**
रसायनी पाताळगंगा हद्दीतील माजगाव ग्रुप ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी प्रांजल प्रदीप जाधव यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड होताच शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी नवनिर्वाचित उपसरपंच प्रांजल जाधव यांची भेट घेऊन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच दिपाली पाटील, आत्माराम पाटील, राजेश पाटील, नरेश पाटील, दीपक जाधव, मंगेश पाटील, वैशाली महाब्दी, रमेश ढवाळकर, मधुकर गायकवाड, वंदना महाब्दी, अपर्णा शिंदे, सरिता वाघे, संदीप जाधव, शशी ढवालकर, पूनम जाधव, अशोक जाधव, अविनाश कांबळे, जयवंत पाटील, विलास कांबळे, रामदास काठावले, रणधीर पाटील, महेश महाब्दी, शांताराम ठोंबरे, राजेश जाधव, बंटी पाटील, निखिल ठोंबरे, प्रकाश ठोंबरे, निलेश ठोंबरे, गोरख रसाळ व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पावसाळ्यातील पुरक व्यवसाय



**। कोर्लई । वार्ताहर ।**
अन्य व्यवसायाबरोबरच पावसाळ्यात छत्री दुरुस्ती व्यवसायाकडे पुरक व्यवसाय म्हणून पाहिले जात असून पावसापासून संरक्षण करण्यासाठी छत्र्यांना अधिक प्राधान्य दिले जाते.

त्यातही एकदा छत्री घेऊन ती दुसऱ्या वर्षांच्या पावसात दुरुस्त करून वापरणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे सुरू झालेल्या पावसात छत्र्या दुरुस्त करणाऱ्यांच्या व्यवसायात वाढ झालेली आहे. छत्रीची तार बदलण्यासाठी ३० ते ४० रुपये मोजावे लागत आहेत, तर दांडा बदलून घेण्यासाठी ८० ते ९० रुपये मोजावे लागत आहेत. छत्री दुरुस्तीसाठी विविध लागणाऱ्या साहित्याच्या किमतीत यंदा ५० टक्क्याने वाढ झाली आहे.

# काशीद-बारशीव रस्त्यावर झाड कोसळले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरूड तालुक्यातील काशीद -बारशीव रस्त्यावर शुक्रवारी (दि.१९) मध्यरात्री अतिवृष्टीमुळे एक मोठे झाड पडल्याची घटना घडली होती. यामुळे या महामार्गावरील वाहतूक काही तास खोळंबली होती. रात्रीची वाहतूक कमी असताना सुद्धा रस्त्याच्या दोन्ही बाजूस गाड्यांची लांबच लांब रांग लागली होती. सध्या मुरुड तालुक्यात पावसाची अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे भल्या मोठ्या झाडाची माती वाहून गेल्याने झाड पडण्याच्या घटना घडत आहेत.



झाड पडल्याचे वृत्त समजताच मुरुड पोलीस ठाण्याचे नुकतेच नियुक्त झालेले पोलीस निरीक्षक उदय झावरे यांनी या घटनेची तत्काळ दखल घेत त्यांनी सर्वात प्रथम काशीद ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष राणे यांच्याशी संपर्क साधून झाड हटवण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले हाते. सरपंच संतोष राणे यांनी सुद्धा काशीद ग्रामस्थ व झाड तोडण्यासाठी लागणाऱ्या कटरची मदत तातडीने मिळवून देत हे झाड हटवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. अवघ्या काही तासात वृक्ष रस्त्यावरून हटवण्यात मोठे यश प्राप्त झाले आणि खोळंबलेली वाहतूक पुर्ववत करण्यात आली.

# शेकडो विद्यार्थ्यांकडून सिडबॉलचे रोपण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**
नेरळ विद्यामंदिर शाळेने विद्यार्थ्यांच्या मदतीने पर्यावरणपूरक अभिनव उपक्रम साजरा केला. विद्यार्थ्यांनी बनवलेले सिडबॉलचे रोपण नेरळ ग्रामपंचायत हद्दी मधील माथेरान डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या फणसवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले.

नेरळ विद्यालयाच्यावतीने फणसवाडी येथे सिडबॉल आणि वृक्षारोपण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला होता. शाळेच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांच्यावतीने उन्हाळ्याच्या सुट्टीत गोळा केलेल्या विविध प्रकारच्या फळांच्या बीजांचे रोपण आणि नवीन रोपांची लागवड फणसवाडी येथील डोंगर परिसरात करण्यात आली. विद्यामंदिर मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीप गडकरी यांनी नेरळ विद्या मंदिर येथील एका कार्यक्रमाप्रसंगी पर्यावरणसंवर्धन विषयक मार्गदर्शन करताना सिडबॉलची अभिनव कल्पना शिक्षकांसमोर मांडली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या फळांच्या बिया गोळा करून त्या मातीत टाकून ओलसर मातीचे गोळे तयार केले. तसेच, ते सुकवून डोंगर आणि माळरान अशा ठिकाणी नेऊन रोपण करावयाचे ठरले होते.

याच बिया त्या ठिकाणी मातीत रुजून त्याची रोपे तयार होतात व वाढतात अशी ही सुंदर कल्पना होती. प्राचार्य प्रमोद विचवे यांनी ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे धोरण घेतले. यावेळी शाळेच्या सांस्कृतिक समिती प्रमुख लाड क्रीडा शिक्षक जयवंत पारधी, पी.पी. विशे, एस.एल. सुतार, वाय.व्ही. गेंगजे, कृष्णा हाबळे, एन.एल. वडणे, ए.एम. वसावे इत्यादी शिक्षक उपस्थित होते.

### जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री इंग्रेशिअस व्हिक्टर डलगाडो यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३९/१८ श्री. इंग्रेशिअस व्हिक्टर डलगाडो यांचे हिश्याचे एकुण क्षेत्र ०.८२.०० गुंठे पैकी ०.२९.०० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनाक २१/०७/२०२४

**अॅड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

**REPUTED CONSTRUCTION COMPANY REQUIRES**

- PROJECT CO-ORDINATOR ..... (Exp. 10 - 15 Years)
- PROJECT MANAGER ..... (Exp. 5 - 10 Years)
- SITE ENGINEER ..... (Exp. 5 - 10 Years)
- BILLING ENGINEER ..... (Exp. 5 - 10 Years)
- SITE SUPERVISOR ..... (Exp. 5 - 10 Years)
- SAFETY OFFICER ..... (Exp. 5 - 10 Years)
- STORE KEEPER ..... (Exp. 3 - 5 Years)
- ACCOUNT ASSISTANT ..... (Exp. 3 - 5 Years)

Site Location :- Rasayani Patalganga MIDC & Talegaon Dabhade

Interested candidates may apply Mail Id - hr.dsmec@gmail.com
Mobile No : 9011027720 / 020-25454544

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मनिंदर जीत उर्फ जितसिंग कम्बो व कुलदिप कौर मनिंदर कम्बो यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ४१/४ | एकुण ०-६८-२० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-३४-१० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ८-६४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लिज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हवक हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
दिनांक : २१/०७/२०२४

**अॅड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**अॅड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)
ज.म. र अर्ज १४/२०२३

श्रीम. शालिनी नथुराम मोहिते
रा. रांजणपाडा, पो. आवास — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत आवास,
मु. आवास — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रांजणपाडा येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे पती कै. नथुराम दादू मोहिते यांचा मृत्यु दि ०७/०४/२००४ रोजी ग्रामपंचायत आवास येथील रांजणपाडा येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत आवास येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत आवास यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि.२०/०८/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निक/निर्ण देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१८/०७/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २०/०७/२०२४ — **(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

अॅड.रिटा सोलंकी

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्त. सो. रायगड यांचे कोर्टात**

रेग्युलर मुकदमा नं.१६६/२०२४

श्री. निलेश सुरेंद्र चवरकर
स्वतः करिता व पोयनाड गावाचे
प्रतिनिधी स्वरुपात
वय. ४२ वर्षे, व्य. खाजगी व्यापारी, — वादी
रा.मु.पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
विरुध्द
१. ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड,
पोयनाड, ता. अलिबाग,जि. रायगड
२. कार्यकारी अभियंता,
रायगड जिल्हा परिषद
मृद व जलसंधारण विभाग — प्रतिवादी
अलिबाग, जि. रायगड.
३. विदुला एंन्टरप्राईजेस तर्फे उपठेकेदार
श्री. मंगेश एकनाथ सुर्वे
वय. सज्ञान, व्य. कंत्राटदार
रा.मु.पो.पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे पोयनाड आंबेपुर हद्दीतील पोयनाडचे तलाव या नावाने प्रसिद्ध असलेल्या तलावात जे एस.डब्ल्यू चे निकामी विषारी स्लेगचे भरावाचे काम चालु असुन या विषारी स्लॅगच्या भरावाने सार्वजनिक जनजीवनेला धोका असल्याने सदरहु भरावाचे काम तातडीने थांबविण्यात यावे याकरीता वादी यांनी स्वतः करीता व समस्त ग्रामस्थाच्या वतीने व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मे. कोर्टात प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेविरुद्ध निरंतर ताकीदीकरिता व तदनुषंगिक मागणीकरीता दावा दाखल केला असुन सदरहू दाव्याची पुढील तारीख २०/०८/२०२४ नियुक्त केलेली आहे.

वरील तरी मिळकतीबाबत व दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात कुणाचेही काहीही म्हणणे असल्यास अथवा आक्षेप, हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दिवसाच्या आत अथवा वर नमुद केलेल्या तारखेच्या दिवशी या न्यायालयात वैयक्तिकरीत्या अथवा वकीलामार्फत आपले म्हणणे, अगर आक्षेप, हरकती असल्यास पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

सही/- — सही/-
**लिपीक** — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग** — **(कोर्टाचा शिक्का)** — **दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील
अॅड नितेश ठाकूर

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी रोहा, जि.रायगड यांचे न्यायालय**
जन्म-मृत्यू नोंद क्र. ४५/२०२४

प्रति,
१.श्री.अनंत रामा ठाकूर — अर्जदार
रा.यशवंतखार, ता.रोहा, जि.रायगड
विरूद्ध
१.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ता.रोहा
२.ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सानेगाव, ता.रोहा — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचा भाऊ कै.वामन रामा ठाकूर हे दिनांक १५/०७/१९८७ रोजी मौजे यशवंतखार, ता.रोहा, जि.रायगड येथे मयत झालेले असून त्यांची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत सानेगाव, ता.रोहा, यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या भावाच्या मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी रोहा, जि.रायगड या न्यायालयात जन्म व मृत्यू अधिनियम १९६१चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी कै.वामन रामा ठाकूर हे दिनांक १५/०७/१९८७ रोजी मयत झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.२०/०८/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांच्या आजीची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व विहीत मुदतीत प्राप्त न होणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता.०९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(डॉ.किशोर देशमुख)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी रोहा**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक ०२१४०-२६१३१७ फॅक्स - २६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२३१७/२०२४ — दि.१८/०७/२०२४

### जाहिर नोटीस मसुदा

१. श्री. सुनिल दत्तात्रेय सानप — अर्जदार
रा. गिरणे, ता. तळा जि. रायगड
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी
अधिकारी गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा — सामनेवाला
२. ग्रुप ग्रामपंचायत गिरणे ता. तळा जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै. दत्तात्रेय लक्ष्मण सानप यांचा मृत्यू दि. ०३/०३/१९८५ रोजी मौजे गिरणे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. ०८/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै.दत्तात्रेय लक्ष्मण सानप यांचा मृत्यू दि. ०३/०३/१९८५ रोजी मयत झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे वडील कै. ०दत्तात्रेय लक्ष्मण सानप यांचा मृत्यू दि.०३/०३/१९८५ रोजी मौजे गिरणे येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक. १८ जूलै, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक संतोष शशिकांत केळजी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे खांडपे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग /सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३१/५ | एकुण ०-३६-४० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-१९-६० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लिज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २१/०७/२०२४

**अॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**अॅड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी नर्सेसची आवश्यकता आहे. संपर्क :- ९८२२४०९८४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# एकाच दिवसात २९ प्रकरणे निकाली

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

**राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात अग्रणी असलेल्या राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या कामकाजाची सुनावणी पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या सभागृहात सोमवारी पार पडली. यावेळी सकाळ व दुपारच्या सत्रात शालेय शिक्षण विभागाशी संबंधित २१ प्रकरणे निकाली लागली.**

महिला बालविकास विभागाशी संबंधित ८ प्रकरणे निकाली लागल्या. बालकांच्या हक्कांसंबंधीच्या विविध प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुशीबेन शाह स्वत: हजर राहिल्या होत्या. यावेळी पुन्हा एकदा त्यांच्या कामाचा धडाका दिसून आला. सुनावणीदरम्यान, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम २००९, पोस्को कायदा जेजे ऑफ आणि बालहक्क अधिनियमन २००५ अनन्वये प्राप्त तक्रारीवर सुनावणी झाली. शाळा सोडल्याचा दाखला न देणे, शिक्षणापासून वंचित ठेवणे, शालेय फी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणापासून वंचित ठेवणे, शाळेचा मनमानी कारभार, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियमन २००९ ते २५ टक्के आरक्षित प्रक्रिया २०१९ अंतर्गत प्रवेश नाकारणे, शिक्षकाच्या बदली विरुद्ध झालेल्या आंदोलनामध्ये अल्पवयीन मुलाचा समावेश करणे, फी न भरल्यामुळे अपमानास्पद वागणूक, शाळेकडून होणारी पिळवणूक, मुलांवर मानसिक दडपण आणणे अशाप्रकारच्या रायगड जिल्ह्यातील २९ सुनावण्या घेण्यात आल्या. याप्रसंगी, पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक जिल्हा परिषद रायगड, सुनिता चांदोरकर, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी पनवेल, रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी, पनवेल महानगरपालिका, संबंधित तक्रारदार, शाळेचे मुख्याध्यापक, वकील उपस्थित होते. तसेच महिला बालविकास विभागाच्या वतीने विनीत म्हात्रे, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, अध्यक्ष, सदस्य उपस्थित होते. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उपस्थित होते. बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या ॲड. नीलिमा चव्हाण, विधी सल्लागार प्रमोद बाडगी, शिक्षणाधिकारी माधवी भोसले, परिवेक्षा अधिकारी उज्वला होवाळ आदींची

> **शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणे, ही मुख्य जबाबदारी असते. परंतु, काही शालेय संस्था ही जबाबदारी विसरत चालेल आहेत. त्यामुळे काही शिक्षण संस्थाचा मनमानी कारभार चालतो. यात विद्यार्थी व पालक भरडले जातात. यामध्ये शिक्षणाधिकाऱ्यांनी जातीने लक्ष दिले पाहिजे. लहान मुलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.**
> **– ॲड. सुशीबेन शाह, अध्यक्षा, राज्य बालहक्क संरक्षण आयोग**

# टाकादेवी येथे आठ फुटी अजगराला जीवदान



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील टाकादेवी येथील श्री. इटकर यांच्या घराच्या पडवीत शुक्रवारी (दि. १९) सकाळच्या वेळी भला मोठा अजगर येऊन बसला होता.

याबाबतची माहिती चोंढी येथील सर्पमित्र आसिफ मलिक व बहिरोळे येथील सर्पमित्र अविनाश थळे यांना दिली. त्यांनी वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेऊन आठ फूट लांब असलेल्या अजगराला पकडून सुरक्षितरित्या नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. याबद्दल सर्पमित्रांचे कौतुक केले जात आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२१ जुलै**

१) श्रीमती विमल गणपत भगत
अलिबाग, २१-७-१९४९


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# बिर्ला कार्बन कंपनीकडून विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा




**। रसायनी । वार्ताहर ।**

बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि. पाताळगंगा या कंपनीच्यावतीने रायगड जिल्हा परिषदेच्या वडगाव शाळेत विद्यार्थी यांची दंतचिकित्सा करण्यात आली. यावेळी शाळेतील एकूण ९६ विद्यार्थ्यांचे दात तपासून त्यांना एक दात घासण्याची किट भेट देण्यात आले.

या शिबिरासाठी बिर्लाचे डॉ. रावत, गायकवाड व एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. रफिक नालबंद व त्यांच्या गटाने दंतचिकित्सा करून विद्यार्थ्यांना टूथ ब्रश, टूथ पेस्ट, घासणी असा किट देण्यात आला. यावेळी बोलताना मुख्याध्यापक सुभाष राठोड म्हणाले, मुलांच्या आरोग्याची नियमित काळजी घेणे आवश्यक असून, बिर्ला कार्बन इंडिया, प्रा.लि.ने आमच्या विद्यार्थ्यांसाठी दंतचिकित्सा शिबीर आयोजित करून विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. येथील सर्व विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी शिबीर घेण्यात येईल, असे आश्वासन डॉ. रफिक नालबंद यांनी दिले.

# मोठे भोम शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा उद्योजक घनश्याम केशव पाटील यांचा जन्मदिवस मोठे भोम येथील प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसोबत नुकताच साजरा करण्यात आला. त्यानिमित्त अंगणवाडी ते चौथीपर्यंतच्या ५५ शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच खाऊचे देखील वाटप करण्यात आले.

यावेळी चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, इंटेकचे राजेंद्र भगत, किशोर केणी, मनोज ठाकूर, शाम पाटील, समाधान पाटील, सुमित पाटील, सर्वेश पाटील, मुख्याध्यापिका सुनीता मॅडम, अंगणवाडी सेविका अपर्णा पाटील, प्रेरणा पाटील, स्वराज पाटील, नामदेव बरतोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वृक्षतोड करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर।**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार महापालिका कार्यक्षेत्रातील तोंडरे गावातील एका शेतकऱ्याच्या जमिनीवरील वृक्षतोड करणाऱ्या अज्ञात इसमांविरोधात महापालिकेच्यावतीने तळोजा पोलीस ठाण्यामध्ये अदखल पात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील तोंडरे गावातील एका शेतकऱ्याच्या जमिनीवरील आंबा, केळी, शेवगा अशी १२ झाडे अंधाराचा फायदा घेऊन अज्ञातांनी तोडली होती. याबाबतची तक्रार महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडे आल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार या गुन्ह्यातील अज्ञात इसमांविरोधात तळोजा पोलिसात अदखल पात्र गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल महापालिका हद्दीतील झाडे तोडण्यापूर्वी महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक असते. संबंधित ठिकाणी तोडलेल्या झाडांपैकी काही झाडे ही भाजीवर्गीय असून, त्याविरोधात तक्रार करता येत नाही, त्यामुळे तीन आंब्यांच्या झाडांच्या फाद्यांची छाटणी करून झाडास इजा व नुकसान पोहोचविल्याबद्दल अज्ञांताविरोधात तळोजा पोलीस ठाण्यामध्ये अदखल पात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पनवेल आगारांत २६ जुलैला प्रवासी राजा दिन

**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने १५ जुलैपासून प्रवाशांच्या समस्या, तक्रारीवजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात दर सोमवारी व शुक्रवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमास विभाग नियंत्रक आगारात जाऊन प्रवाशांच्या व रा.प. कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी व सूचना ऐकून घेतील.


पनवेल येथे शुक्रवारी (दि. २६) आणि उरण येथे सोमवारी (दि. २९) रा.प. आगारात सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा, महाविद्यालये आपल्या समस्या, तक्रारी सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतात. प्रवासी राजा दिन झाल्यानंतर दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे.

# मोबाईलची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमध्ये एनएमएमटी बसमध्ये चढत असताना एका महिलेचा महागडा मोबाईल अज्ञात चोरट्याने खिशातून चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. श्वेता राठोड या एनएमएमटी बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी त्यांचा मोबाईल चोरुन नेला.

# सवतकडा पर्यटकांच्या प्रतीक्षेत


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)


**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

वर्षा पर्यटनात महत्त्वाचा दुवा ठरणारा सवतकडा येथील मुख्य धबधबा अखेर ओसंडून वाहू लागला आहे. त्यामुळे याठिकाणी पर्यटकांचा ओघ वाढणार आहे. सवतकडा धबधबा हा मुरुड तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सायगाव या गावापासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. घनदाट वृक्षराजीतून या रस्त्यावरुन या धबधब्यावर जाता येते. एका बाजूला उंचच्या उंच कडा, त्यातून फेसाळत खाली येणारे दुधाळ धबधबे, तर दुसऱ्या बाजूला धुक्याचे अच्छादन इथला निसर्ग न्याहाळताना अनेकांना सेल्फी काढण्याचा मोह आवरत नाही. निसर्गाची ही जादुई दुनिया पाहण्यासाठी सवतकडा धबधब्यावर पर्यटकांची गर्दी होत असते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २१ ते २७ जुलै २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## व्यवसायाला चालना मिळेल




**मेष :** या राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता मनातील वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. आपण आपली अस्मिता खुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तू सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. **महिलांना-** सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागेपर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. **शुभदिनांक-** २३,२४

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा



**वृषभ :** या राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. मात्र, आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. अपेक्षित गोस्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, **महिलावर्ग-**बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभदिनांक -** २१,२२

## अपेक्षापूर्तीचा आठवडा




**मिथुन :** या राशीसाठी हा सप्ताह आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभदिनांक -** २५,२६.

## कामाची दगदग वाढेल




**कर्क :** या राशीधारकास या सप्ताहात आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. अमावस्येच्या दिवशी पितरांची आठवण काढा. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तू मिळेल. प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील. आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य होणार आहे, तोपर्यंत दम धरणे क्रमप्राप्त राहील, घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. कोर्टकचेरीही होऊ शकते. कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका. कामकाज नसलेल्यांना अचानक काम हाती येणार आहे त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. **महिलांना-** आपण सामंजस्य ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधी देणारी असेल. आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा ही ठरवा, बाकी सर्व सोप्पं होईल. **शुभदिनांक -** २१,२७.

## जोडीदाराची साथ लाभेल



**सिंह :** या राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. कुणालाही नाराज करू नका. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. **शुभदिनांक-** २२,२४.

## संधीचे सोने करा



**कन्या :** या राशीसाठी या सप्ताहात कमी पैसे असले तरी हातातील संधी सोडू नका. आपल्या जिवलगासोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल. योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. नोकरदारवर्गाने मोठ्या मंडळींबरोबर गोड बोलून राहावे, जुन्या समस्या व चिंता मिटणार आहेत. अमावस्येच्या दिवशी श्वानाला खाण्यास द्या. घरात एखादे मंगलकार्य होणार आहे, त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्यांना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका, त्रास होऊ शकतो. कलाक्षेत्राला उत्तम हा कालावधी उत्तम असून, पितरांचे स्मरण करणे महत्त्वाचे आहे. महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे, एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना-** आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभदिनांक-** २३,२४.

## नोकरदारांना दिलासा




**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे. पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाहेच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलांना-** आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभ दिनांक-** २५,२७.

## कामांना गती प्राप्त होईल




**वृश्चिक :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेवून जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा, घरातील वातावरण बदलून जाईल. एखादे शुभकार्य करण्याबाबत ठरवले जाईल. इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल, ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. **महिलांना-** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभदिनांक-** २३,२६

## गुरुकृपेचा लाभ घेता येईल



**धनु :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा, खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे. आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक-** २१,२३

## आर्थिक व्यवहारात सावधिगिरी बाळगा



**मकर :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. **महिलांना-** मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. **शुभदिनांक-** २४,२५

## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल



**कुंभ :** या राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना-** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका, नाहीतर डॉक्टर खर्च वाढण्याची शक्यता आहे. कोणतेही काम सल्ला घेऊन करा. **शुभ दिनांक-** २३,२६.

## कर्तृत्वाला वाव मिळेल




**मीन :** या राशीसाठी या सप्ताहाचे एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना-** मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **शुभ दिनांक-** २४,२७

**काळ बदलला, जगण्याची परिमाणे बदलली आणि शिक्षणाच्या व्याख्येत आमूलाग्र बदल झाला तरी गुरूची महती तसूभरही कमी झालेली नाही. उलटपक्षी, दिवसामाजी ती वाढतानाच दिसत आहे. शिक्षण केवळ अर्थार्जनास पात्र बनवत नाही तर जीवनाच्या सर्वांगी बहराचे ते मूळ असते. हा पाया पक्का असेल तर प्रत्येक प्रत्येक टप्प्यात जगण्याचा निर्भेळ आनंद घेता येतो. म्हणूनच अशा गुरूचा सहवास मिळणे अत्यावश्यक ठरते.**

## मोहोर

# वंदावे गुरुपद



वैष्णवी कुलकर्णी

आज आपल्याकडे अभावानेच गुरू-शिष्य परंपरेतील शिक्षणपद्धती अस्तित्वात दिसते. आपले घरदार सोडून, गुरुगृही निवास करत, गुरूच्या आज्ञेनुसार, त्याने सांगितलेल्या कसोट्यांवर खरे उतरत ज्ञान प्राप्त करणे आणि गुरूच्या मतांचा आदर राखत गृहस्थाश्रमात प्रवेश करुन उत्तम प्रपंच करणे ही एके काळी भारतात नांदणारी संस्कृती होती. या संस्कृतीने अनेक गुरू पाहिले आणि गुरूंनी घडवलेल्या अनेक शिष्योत्तमांनी घडवलेला इतिहासही आपण पाहिला. आज काही मोजकी क्षेत्र वगळता हे चित्र अभावेच दिसते. गुरूच्या नावाखाली गैरफायदा घेणारे, श्रद्धेचा बाजार भरवून त्यावर पोळी भाजून घेणारे अनेक आहेत. मात्र, असे असले तरी योग्य गुरू आणि योग्य शिष्य काय चमत्कार घडवून दाखवू शकतात हे सांगणारी काही उदाहरणेही आहेत. म्हणूनच आजच्या काळातही या परंपरेचे पाईक होण्याचा प्रयत्न होताना दिसतो.

आपल्या संस्कृतीत दान सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. गुरू विद्यादान करत असतो. आपले ज्ञान इतरांना देत असतो. ज्ञान दिल्याने वाढते असे म्हणतात. म्हणूनच त्याचे शिष्य हा ज्ञानरूपी वसा सांभाळून त्याचा वारसा पुढे चालवतात. जुन्या काळात गुरूकुल पद्धत अस्तित्वात होती. आज ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. ज्ञानदानाचे कार्य कोणत्याही पद्धतीने सुरू असले तरी गुरू हा त्यातला समान धागा आहे. गुरू शिष्याचे व्यक्तिमत्त्व घडवतो. या जगात टिकून राहण्यासाठी सज्ज करतो. गुरू कधीही हातचे राखून ठेवत नाही. तो शिष्यावर भरभरून प्रेम करतो. शिष्याला आपले मूल मानतो. त्याच्यावर संस्कार करतो. तो अत्यंत निरपेक्ष वृत्तीने विद्यादानाचे पवित्र कर्तव्य करत असतो. शिष्याचे यश हीच त्यांची गुरूदक्षिणा. शिष्याचे कौतुक झाले की तो भरून पावतो. म्हणूनच गुरूपौर्णिमेला गुरूचा महिमा सांगितला जातो. गुरूपौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा. या दिवसाचे महत्त्व मोठे, महतीही मोठी. गुरूपौर्णिमेला शिष्य गुरूला भेटायला जातात, त्याचे आशीर्वाद घेतात. ही गुरूमाऊलीही शिष्याच्या भेटीने आनंदते, सुखावते. प्रत्येकाला गुरू वेगवेगळ्या रूपात भेटत असतो. वेगवेगळ्या विद्या शिकवत असतो. मात्र आपण कितीही 'टेकसॅव्ही' झालो किंवा ऑनलाईन वर्गांमध्ये रमलो तरी गुरूचे महत्त्व तसूभरही कमी होत नाही आणि होणारदेखील नाही.

तसे पहायला गेले तर विधात्याने प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या गुणांनी उपकृत केलेले असते. प्रत्येकाच्या अंगी काही दोष असतात तसेच बरेच गुणही असतात. नित्याच्या परिचयात पालकांना मुलांच्या अंगीचे हे गुण जाणवतातच असे नाही. मात्र पारखी नजर असणारा गुरू मुलामुलींमधील हे गुण तात्काळ ओळखतो आणि त्याला बाहेर काढण्याचे काम करतो. गुरू साम, दाम, दंड, भेद या सर्व प्रकारांचा वापर करत शिष्याला पारंगत करण्याचा प्रयत्न करतो. विशेष म्हणजे, हे काम अत्यंत निस्वार्थी वृत्तीने होत असते. माणूस घडवण्यासाठी, दैवी देणगीचा यथोचित वापर होण्यासाठी, व्यक्तिमत्त्व बहरण्यासाठी याची नितांत आवश्यकता असते. शिष्य केवळ अनुसरणाने बरेच काही शिकत असतो. गुरूचा सहवास त्याला अनेक गोष्टींचे अप्रत्यक्ष धडे देत असतो. परिस्थितीविषयी अवगत करत असतो. त्याचे अनुभवाचे बोल न शिकवताही बरेच काही सांगून जात असतात. म्हणूनच प्रत्येकाला पुढे जाण्यासाठी एखाद्या गुरूची आवश्यकता असते. प्रापंचिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रवासात मिळणारी त्याची साथ प्रवासाला योग्य दिशा देणारी ठरते. म्हणूनच आज नानाविध अंगाने माहितीचे भांडार उपलब्ध होत असले तरी ज्ञान मिळण्याची काही मोजकेच ठिकाणे आढळतात. गुरूचे चरण हे त्यातील एक विश्वासनीय ठिकाण आहे.

आज एखाद्याकडे समग्र माहिती असते, पण त्याचा नेमका कुठे आणि कसा वापर करायचा हे ज्ञान गुरूशिवाय मिळत नाही. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधने आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरूचे स्थान अबाधित आहे. कारण गुरू कुठलेही ज्ञान आपल्यापर्यंत सोप्या शब्दात पोहोचवत असतो. ज्ञानावर त्याचे संस्कार झालेले असतात. एखाद्या विषयावर अभ्यास, मनन आणि चिंतन करुन त्याने तो विषय समजून घेतलेला असतो. असा स्वत:ला समजलेला विषय दुसऱ्यापर्यंत पोहोचवताना तो आनंदी असतो. दुसऱ्याला हे ज्ञान देण्यामागे त्याची तळमळ असते. आपल्याला आकलन झालेल्या विषयावर विद्यार्थ्याने आणखी काम करावे, त्यावर अधिक संशोधन व्हावे आणि ज्योतीने ज्योत प्रज्वलित होत रहावी, ही सच्च्या गुरूची मनोधारणा असते. म्हणून शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्याने त्रिखंडात कीर्ती मिळवावी या उद्देशाने तो काम करतो. शिष्याच्या प्रगतीवर त्याच्या या सकारात्मक भावनांचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. म्हणूनच काळ बदलला तरी गुरूला पर्याय नाही.

आपल्याकडील गुरूपरंपरा बहुआयामी आहे. गुरूचे निवासस्थान, त्यातील शिष्याचा निवास आणि कठोर नियमांचे आचरण या सगळ्याच बाबी त्याच्या जडणघडणीसाठी आणि सामाजिक सलोख्याशी संबंधित आहेत. वडीलधाऱ्यांबरोबर समवयस्कांमध्ये राहून इथे होणारे संस्कार मुलांना जगण्याच्या पद्धतींशी अवगत करायचे. आता आपण त्या वातावरणातून बाहेर आलो आहोत. आता मुले शाळेत शिकतात. मात्र, असे असतानाही संस्कारांमध्ये बदल होणे अपेक्षित नाही. परिस्थितीच्या बदलत्या रेट्यामध्ये आजचे शिक्षण विद्यार्थी नव्हे तर, परीक्षार्थी घडवत आहे. आता सगळ्याच घटांना एकसारख्या साच्यातून बाहेर काढले जातेय. सर्वांना एकाच तागडीत तोलू पाहतेय. अर्थातच याचे तोटेही समोर दिसत आहेत. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. गुरूची रत्नपारखी नजर प्रत्येकातील विशेष गुण चाणाक्षपणे हेरत असे. प्रत्येक मातीचा कस लक्षात घेऊनच त्याला पूरक साच्यात घडवले जात असे. म्हणूनच तयार होणाऱ्या प्रत्येकाचा आकार वेगळा, रंग वेगळा, रूप वेगळे आणि अस्तित्व वेगळे असे. प्रत्येकाच्या अस्तित्वाला अर्थ देण्याचे काम असे विनासायास पार पडत असे. पण आता या संकल्पनेचे विकेंद्रीकरण झाले आहे. सकाळी शाळेत शिकायचे, दुपारी क्लासला जायचे, एखाद्या तिसऱ्याचे साहित्य अभ्यासाला पूरक म्हणूनच वापरायचे, गरज वाटल्यास घरातल्याचे सहाय्य घ्यायचे. म्हणजेच एक गुरू-एक शिष्य ही स्थितीच आता राहिलेली नाही.

गुरूगृही असल्यामुळे विद्यार्थ्याच्या चारित्र्याचा, व्यासंगाचा, वागणुकीचा, व्यवहारज्ञानाचा प्रभाव शिष्यांवर पडत असतो. हे संस्कार अगदी कळत-नकळत घडतात आणि तेच त्या कोवळ्या वयात आदर्श निर्माण करत असतात. आयुष्यभर दीपस्तंभासारखी साथ देत असतात. पण काळाच्या प्रवाहात हा प्रघात मागे पडला आणि शिक्षणाचा बाजार मांडणारी एक व्यवहारी व्यवस्था अस्तित्वात आली. पण याचा अर्थ असा नव्हे, की आज गुरूपदी बसवावे असे लोकच नाहीत. सगळीकडे पसरलेली भेसळीची कीड इथेही पसरली असली तरी अनेक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वे आपल्या आयुष्यात येतात. त्यातील काही लोक तर निरिच्छ भावनेने विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. आज गुरूप्रती आदर कमी होतोय ही वस्तुस्थिती आहे. गुरूला एकेरी संबोधण्यापर्यंत ऱ्हास झालाय हे देखील वास्तव आहे. पैसा मिळवणे हे इप्सित समोर ठेवून विद्यादान करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. पण म्हणून सगळे संपले असे नाही. कल्पना आणि वास्तव या दोन विरुद्ध बाबी असतात. त्या सांधणे हे कर्मकठीण काम. पण काहींना ही किमया साधते आणि बदलत्या प्रवाहातही स्वत्त्व टिकवून प्रवास सुरू ठेवला जातो. आजही असे अनेक आदर्श आहेत.

आजही गतस्मृतींचा धांडोळा उलगडतो तेव्हा आपले शिक्षक, त्यांनी केलेला उपदेश आठवतो. शिक्षक अचानक रस्त्यात भेटले तर नकळत पायाला हात लावून नमस्कार केला जातो, जातीने विचारपूस केली जाते. वय आणि प्रगल्भता वाढत असताना शिक्षकांचा आठव अधिक गहिरा होत जातो. आजच्या पिढीलाही या अनुभूतीचा आनंद घेता यावा अशी इच्छा आहे. गुरूपौर्णिमा इव्हेंट होता कामा नये. किमती भेटवस्तू, हार-फुलांचे गुच्छ देऊन गुरूपौर्णिमेचा इव्हेंट साजरा होईल, पौर्णिमा नाही. ही व्यासपौर्णिमा साजरी करायची तर दोघांची मने विशुद्ध हवीत. मनात प्रेमभाव दाटून यायला हवा आणि हा वसा पुढे चालवण्याचा संकल्प सोडायला हवा. दिल्याने वाढणारी ही एकमेव संपत्ती आहे. **

# मस्तावलेले वरिष्ठ

धनंजय शेट्ये

सुशिक्षित वर्ग समजल्या जाणाऱ्या वैचारिक सुपीकता असलेल्या क्षेत्रातील पिळवणूक अनेकांनी अगदी जवळून अनुभवली असते. स्वत:च्या स्वार्थासाठी सोबतच्या सहकारी वर्गाला नाहक त्रास देऊन मालकाची मर्जी राखण्यासाठी मालकाचे पाय चेपणारे वरिष्ठ अधिकारी कधी कधी पायात घुटमळणाऱ्या लाचार मांजरीसारखे भासतात. मांजर तरी मालकाशी प्रामाणिक असते. उंदरापासून नेत्यांचं घराचं रक्षण करते. रक्षण करतात, पण ही माणसं संस्थेला लागलेली कीड असते. बरं हे वरिष्ठ कधीच कोणाचेच होऊ शकत नाहीत. पैशासाठी इमान विकणारी निर्लज्ज असतात अशी माणसं! आपल्या प्रमोशनसाठी, आपले वेतन वाढविण्यासाठी सहकारी वर्गाचे श्रेय स्वतः लाटून सर्व उपक्रम मीच राबविले, मीच जास्त काम केले असा दिखाऊपणा करुन मालकाची मर्जी राखायची हाच अशा व्यक्तींचा धंदा असतो. अगदी बारीकसारीक गोष्टींची इत्यंभूत माहिती मालकांना देण्याचाच जणू पगार घेतात अशी माणसे.

दुसऱ्याच्या कामाचे, कौशल्याचे श्रेय लाटणारे हे वरिष्ठ अधिकारी गोड बोलून सहकारी वर्गाला धोका देत असतात. वरिष्ठ अधिकारी आपल्या नातेवाईकांना वशिला लावून कामावर लावून घेतात मग आपली एक लॉबी बनवून आपल्याच नातेवाईकांची कार्यालयात एक साखळी तयार करून मालकाला वेठीस धरले जाते.

चमचेगिरी करण्यात आयुष्य खर्ची घालणारी ही माणसे आयुष्यभर दुसऱ्याची हुजरेगिरी करण्यातच धन्यता मानत असतात.

मालकाची मर्जी राखत हुजरेगिरी करत आपलं वेतन दरवर्षी वाढवून घेतलेले असते. गलेलठ्ठ पगाराच्या नोकरीसह उच्चपद हुजरेगिरीने मिळवलेली असते. कर्ता करविता जो आहे, तो मग आपली दैवाची खेळी सुरू करतो, मग खऱ्या अर्थाने कर्माच्या फळांचे खेळ सुरू होत असतात. आपल्या वशिल्याने कुवत नसतानाही नोकरीत सामावून घेतलेल्या पै-पाहुण्यांचे, नातेवाईकांचे चोचले पुरवण्यासाठी आयुष्य वेचणारे वरिष्ठ अधिकारी आता आपल्या मर्जीतील लोकांना सोडून इतरांना नाहक त्रास देण्यात ज्यांनी आयुष्यभर पाप केलेले असते त्यांना शेवटी हिशोब हा पुरा करावाच लागतो. आता त्यांचे दिवस भरले आहेत. त्यांची दैवाने अद्दल घडविलेली असते. आपण नेहमीच माणुसकीचा धर्म स्वीकारून मानवेतचं हित साधणारा मार्ग स्वीकारला पाहिजे. मध्यान्ही तळपणारा सूर्यसुद्धा संध्याकाळी अस्ताला जाताना हतबल दिसत असतो. तशीच सरते शेवटी संध्याकाळ ही प्रत्येक गोष्टीला असतेच.कर्म कराल तसेच शेवटी फळ मिळते. कधी कधी चमचेगिरीमुळे तर कधी दैवाने एखाद्याला उच्च पद मिळते, पण त्याचा गर्व कधीच करु नये. सत्याच्या मार्गाने संघर्षाचे चटके सहन करत आणि दैवाचे फटके खात ध्येयापर्यंत पोहोचून मिळवलेल्या गुणवत्तेला यशाची शिखरे पादाक्रांत करताना कशाचीही भीती नसते. तिथेच खरा स्वाभिमान शक्तीवान बनत असतो. मस्तवाल पदाच्या नशेला बेभान होणाऱ्या अल्पसंतुष्ट आणि बेईमान लोकांना त्यांच्या कर्माची फळे नेहमी मिळतातच. **



(संग्रहीत)

# माऊली तू जगाची!

जावे संतांच्या गावा!

अनुराधा म्हात्रे

**ज्ञानेश्वर महाराज: भाग एक**

तेराव्या शतकात पुण्यापासून अवघ्या २३ किलोमीटर अंतरावर असलेल्या आळंदी या छोट्या गावात ज्ञान सूर्याचा उदय झाला. आळंदी हे गाव तेजाचे केंद्र बनले आणि ते 'श्रीक्षेत्र' आळंदी झाले. त्या काळामध्ये हिंदू धर्मामध्ये कर्मकांडाचे महत्त्व प्रचंड वाढले होते. गेल्या शतकातील एक थोर विचारवंत पु.ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात त्याप्रमाणे, केवळ नरोटीची उपासना चालली होती. आतील खोबऱ्याचे महत्त्व लोपले होते. बाहेरच्या नरोटीचे महत्त्व वाढले होते. कर्मकांडांमध्येच धर्म बघितला जात होता. धर्माचा फक्त सांगाडा उरला होता. आत्मा मात्र हरवला होता. त्या अज्ञान तमाच्या काळामध्ये एका तेजो भास्कराचा जन्म झाला. धर्मामध्ये अंधकार पसरल्यावर मी जन्म घेईन हे भगवद्गीतेत श्री योगेश्वर कृष्णाने दिलेले आश्वासन वाया थोडेच जाणार होते? आळंदीत उदय पावलेल्या या ज्ञानसूर्याचे नाव होते, ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी.



उण्यापुऱ्या २०/२१ वर्षांचे आयुष्य लाभलेला. हे कोवळं पोर जगाची माऊली झालं! सकल संतांनी ही त्यांना माऊली या परमोच्चपदी बसवले. याचे कारण म्हणजे वयाने पोर असलेले ज्ञानेश्वर महाराज कर्तृत्वाने वडील होते. धर्ममार्तंडांना न समजलेला धर्माचा खरा अर्थ त्यांनी लोकांना सांगितला. चंद्रभागेच्या वाळवंटात भागवत धर्माच्या झेंड्याखाली अठरापगड जातीचे लोक एकत्र करून हरिनामाचा गजर मांडला. अध्यात्मिक क्षेत्रांत समतेची तुतारी फुकली. त्यांची ही कृती क्रांतिकारक होती.

फ्रेंच राज्यक्रांतीचे युरोपच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तीन महत्वाची तत्वे दिले असे मानले जाते, मात्र ज्ञानेश्वर माऊलींनी समता, बंधुता ही विचारसरणी तेराव्या शतकातच सांगितली. इथे प्रत्येक गोष्टींत आमची भारतीय संस्कृतीच कशी श्रेष्ठ हे सांगण्याचा हेतू नाही तर, खरोखरच ज्ञानेश्वर महाराजांचे विचार काळाच्या किती पुढचे होते, हे सांगायचे आहे. ज्ञानेश्वरांना 'बडा बंडवाला' म्हणतात. संस्कृतच्या कडीकुलपांत बंदिस्त असलेले अध्यात्मिक ज्ञान त्यांनी खुलेपणाने बहुजन समाजात वाटून टाकले. त्या काळाचा विचार करता ही एक फार मोठी क्रांती होती, बंड होते; असे म्हटल्यास वावगे ठरू नये! माऊलींनी ही क्रांती प्रेमाने केली. कोणतेही विध्वंसक कृत्य, द्वेषपूर्ण भाषा न वापरता हे बंड त्यांनी यशस्वी केले. प्रेमाच्या सूत्रात अवघ्या समाजाला बांधून घेतले म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज जगाची माऊली आहेत.

ज्ञानेश्वर महाराजांसारखी अलौकिक विभूती ज्या कुळात जन्म घेते ते कुळही तेवढेच अलौकिक असते. कारण, शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी! ज्ञानेश्वरांच्या कुळामध्ये पूर्वपार ज्ञान आणि भक्तीची परंपरा होती. त्यांचे पूर्वज पैठणजवळ गोदावरी तीरावर असलेल्या आपेगावचे कुलकर्णी होते. माऊलींचे आजोबा वेदशास्त्र संपन्न होते. त्यांना गोरक्षनाथांनी अनुग्रह दिला होता, तर आजी आजोबांना गहिनीनाथांनी अनुग्रह दिला होता. अशी ही नाथ संप्रदायाची परंपरा ज्ञानेश्वराच्या जन्मापूर्वीही त्यांच्या घराण्यात चालत आली होती. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनाही लहानपणीच शास्त्राचे धडे मिळाले होते. वेद उपनिषदे, व्याकरण इत्यादी गोष्टींमध्ये ते लहानपणीच निपुण झाले. मात्र त्यांचा ओढा बालपणापासूनच वैराग्याकडे होता. विठ्ठलपंत आपल्या आई-वडिलांची अनुज्ञा घेऊन तीर्थयात्रेस निघाले.

विठ्ठलपंतांनी द्वारकेस जाऊन भगवान कृष्णाचे दर्शन घेतले. सुदामपुरी, सोरटी सोमनाथ, भालूका तीर्थ इत्यादी तीर्थे करीत ते महाराष्ट्रात सप्तशृंगी पर्वतावर आले. देवीचे दर्शन घेऊन त्र्यंबकेश्वरी पोहोचले त्यानंतर भीमाशंकर करून अलंकापुरीस म्हणजे आळंदीला आले. इंद्रायणी काठी वसलेले अलंकापुरी (आळंदी) हे क्षेत्रसुद्धा पुरातन काळापासून प्रसिद्ध होते. स्कंद पुराणात सुद्धा अलंकापुरीचे वर्णन आलेले आहे. तेथील सिद्धेश्वर हे शिवालय फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे.

**हे शिवपीठ शिवाचे। हेची**
**पूर्वस्थान अगस्तीचे।**

असे याचे वर्णन नामदेव महाराजांनी केले आहे. इतकेच नव्हे तर, पुढे म्हटले आहे.

**अलंकापुरी कोणी करील कीर्तन।**
**तयालागी येणे वैकुंठीचे।।**

ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत अशा या पवित्र आळंदी क्षेत्री आले. पवित्र इंद्रायणी नदीत स्नान करून सिद्धेश्वराच्या देवळाजवळील अश्वत्थ वृक्षाखाली नित्यदेव पूजा करीत बसले. श्रीधरपंत हे त्यावेळी आळंदी गावचे कुलकर्णी होते. तेसुद्धा अतिशय सात्विक आणि धार्मिक होते. एक तेजपुंज युवक अश्वत्थवृक्षाखाली बसलेला पाहून त्यांनी साहजिकच कुठून आलात, नाव काय, कुळ कोणते, काय करता अशी चौकशी केली. विठ्ठलपंतांनी विचारलेल्या प्रश्नांची नम्रतेने उत्तरे दिली. त्या सालस युवकाबद्दल श्रीधरपंत तथा सिद्धोपंतांना आत्मियता वाटली आणि ते विठ्ठलपंतांना आग्रहाने आपल्या घरी भोजनास घेऊन गेले.

सिद्धोपंतांनी घरी गेल्यावर या तेजस्वी युवकाची बारकाईने चौकशी केली. तेव्हा त्यांच्या मनात विचार आला की, हा युवक कुलशील, वर्तन या सर्वच दृष्टीने उत्तम आहे. याला आपली कन्या अर्पण करावी. त्यांनी विठ्ठलपंतांना आपल्या घरी मुक्कामाला ठेवून घेतले. दुसऱ्या दिवशी त्यांनी आपला विचार विठ्ठलपंतांना बोलून दाखवला, पण विठ्ठलपंत म्हणाले, ''मी तीर्थयात्रा करत आहे शिवाय माता-पित्यांची अनुज्ञा ही घेतलेली नाही त्यामुळे तुमच्या कन्येचा स्वीकार करू शकत नाही मात्र त्यादिवशी रात्रीच, विठ्ठलपंतांना रुक्मिणीचा स्वीकार करण्याबाबत दैवी संकेत मिळाले. त्यांनी विवाहास मान्यता दिली. विवाहोत्तर विठ्ठलपंत पतीसह आपेगावला परतले. काही दिवस सुखाचे गेले पण कालांतराने त्यांचे माता पिता वैकुंठवासी झाले व कुलकर्णीपदाची जबाबदारी विठ्ठलपंतांवर आली. त्यांची वृत्ती वैराग्यशील होती. त्यामुळे त्यांचे संसारात फारसे लक्ष नव्हते. सिद्धोपंतांच्या कानावर ही गोष्ट गेल्यानंतर त्यांनी आपेगावला जाऊन जावयाला विनंती केली की, आम्ही आता म्हातारे झालो आहोत. आम्हालाही आधाराची गरज आहे तेव्हा तुम्ही आळंदीस येऊन राहावे. ही विनंती मान्य होऊन सर्व मंडळी आळंदीस परतली.

सासरेबुवांच्या आग्रहावरून विठ्ठलपंत रुक्मिणीसह आळंदीस आले खरे; पण तिथेही त्यांचे मन संसारात रमत नव्हते. त्यांची विरक्त वृत्ती दिवसेंदिवस वाढतच होती. पोटी मुलबाळ नसल्यामुळे संसार त्याग करून संन्यास घेण्याचा विचार त्यांच्या मनात प्रबळ होऊ लागला. संन्यास घेण्यासाठी पतीची परवानगी लागते. रुक्मिणीबाईंची या गोष्टीस संमती नव्हती. मात्र, एका गाफील क्षणी विठ्ठलपंताने 'जाऊ का 'असे विचारल्यावर, रुक्मिणीबाई 'जा'असे म्हणाल्या. नामदेव महाराज याबाबत लिहितात,

**असता दुश्चितपणे निरोप पुसिला।**
**जा जा म्हणे दिधला अवसारू।।**

पडत्या फळाची आज्ञा प्रमाण मानून विठ्ठलपंतांनी त्या रात्रीच घर सोडले. मजल दर मजल मार्गक्रमण करत काशीस रामानंद स्वामींच्या आश्रमात पोहोचले. स्वामींपाशी त्यांनी संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांची आध्यात्मिक तयारी पाहून रामानंद स्वामींनी त्यांना संन्यास दीक्षा दिली.

चैतन्य स्वामी या नावाने विठ्ठलपंत संन्यास आश्रमात रममाण होऊन ईश्वर भक्ती करू लागले. आळंदीमध्ये रुक्मिणीबाईंवर मात्र आकाश कोसळले. आपल्या पतीने संन्यास घेण्यासाठी घर सोडले हे त्यांनी मनोमन जाणले. त्यांना फार दुःख झाले. त्या साध्वी स्त्रीने आपल्या पतीला कोणत्याही प्रकारचे दूषण न देता स्वतःचे जीवनही यापुढे ईश्वर भक्तीत घालवायचे असा निश्चय केला. नित्यनेमाने इंद्रायणीमध्ये स्नान करून पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याचे व्रत सुरू केले. दिवसभर घरातील कामे करत ईश्वर चिंतनात रूक्मिणीबाई आपले मन रमवू लागल्या. त्या पतिव्रता साध्वी स्त्रीची अशी तपश्चर्या सुरू झाली. **

**निवडक**

## पीसीबीचा मोठा निर्णय

**कराची :** टी-२० विश्वचषकातील खराब कामगिरीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्ड एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेत आहे. आता पीसीबीने बाबर आझम, मोहम्मद रिझवान आणि शाहीन शाह आफ्रिदीविरोधात मोठा निर्णय दिला आहे. या तिन्ही खेळाडूंना परदेशी क्रिकेट लीगमध्ये खेळण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. हे तिन्ही खेळाडू पाकिस्तान संघाच्या सर्व फॉरमॅटचे खेळाडू आहेत आणि पुढील ८ महिन्यांत राष्ट्रीय संघाला त्यांची गरज आहे. यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे पीसीबीकडून सांगण्यात आले आहे.

## ‘ही कार्टूनगिरी बंद करा’

**नवी दिल्ली :** मोहम्मद शमीने पाकिस्तानचा माजी कर्णधार इंझमाम उल हक याने भारतीय संघावर केलेल्या बॉल टॅम्परिंगच्या आरोपांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. शमीने इंझमामला प्रत्युत्तर देताना म्हटले की, त्याने मूर्खपणाचे बोलून जनतेला मूर्ख बनवणे थांबवावे. समजा, मी बॉलमध्ये एखादे उपकरण ठेवले आणि बटण उलट दाबले तर मी इनस्विंग टाकतो आणि चेंडू स्विंग आऊट झाला, तर चौकार जाईल. ही कार्टूनगिरी बंद करा, या लोकांना मूर्ख बनविण्याच्या गोष्टी आहेत.

## धूम्रपानामुळे केली हकालपट्टी

**मोनाको :** पॅरिस ऑलिंपिक स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच जपानच्या कलात्मक जिम्नॅस्टिक संघाला मोठा धक्का बसला आहे. १९ वर्षीय कर्णधार शाको मियाताने धूम्रपान केल्यामुळे तिची संघातून हकालपट्टी करण्यात आली आहे. जपानच्या कलात्मक जिम्नॅस्टिक संघाचे सराव शिबिर मोनाको येथे सुरू आहे. तेथे शाको मियाता धूम्रपान करत होती. यामुळे तिच्यावर तत्काळ कारवाई करण्यात आली. परिणामी तिला सराव शिबीर सोडून मायदेशी परतावे लागले आहे.

## रेसिंगमध्ये गांगुलीची उडी

**नवी दिल्ली :** इंडियन रेसिंग फेस्टिव्हलचा नवीन सीझन २४ ऑगस्टपासून सुरू होत आहे. पहिल्यांदाच रात्रीची शर्यत ही चेन्नईच्या स्ट्रीट रेसिंग सर्किटमध्ये ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी राऊंड २ चा भाग म्हणून आयोजित केली आहे. आता याचा तिसरा सीजन लवकरच येणार आहे. यामध्ये भारताचा माजी क्रिकेटपटू सौरव गांगुलीने देखील उडी घेतली आहे. २०२४ च्या सीझनमध्ये कोलकता रॉयल टायगर्स रेसिंग या टीमचा तो मालक असणार आहेत. ही भागीदारी भारतीय रेसिंगच्या प्रसिद्धीसाठी महत्त्वाची ठरू शकते.

## क्रिकेटच्या मैदानात कोल्हा

**लंडन :** क्रिकेटमध्ये अनेकदा विचित्र घटना घडताना दिसून येतात. अनेकदा क्रिकेट सामन्यांत पाऊस-वारा याव्यतिरिक्त श्वान, साप, पक्षी किंवा मधमाशा आल्याने व्यत्यय आल्याचे दिसून आले आहे. पण आता चक्क कोल्हाच क्रिकेटच्या मैदानात घुसल्याचे दिसले आहे. सध्या इंग्लंडमध्ये विटालिटी ब्लास्ट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत हॅम्पशायर विरुद्ध सरे या सामन्यांत घडली. हा सामना लंडनमध्ये खेळवला जात होता. त्यावेळी अचानक एक कोल्हा मैदानात घुसला.

# आशिया चषकाचा विजयारंभ

**। डंबुला । वृत्तसंस्था ।**

**महिला आशिया चषक २०२४ स्पर्धेतील दुसरा सामना शुक्रवारी (दि.१९) भारत विरुद्ध पाकिस्तान संघात पार पडला. डंबुला येथे होत असलेल्या या सामन्यात भारतीय संघाने ७ गडी राखत दणदणीत विजय मिळवला. या स्पर्धेतील हा दोन्ही संघांचा पहिला सामना होता. त्यामुळे भारताने या स्पर्धेतील मोहिमेची सुरुवात विजयाने केली, तर पाकिस्तानची सुरुवात पराभवाने झाली आहे. तसेच, भारतीय महिला संघाचा हा आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील १०० वा विजय ठरला आहे.**



या सामन्यात पाकिस्तान संघाने भारतासमोर १०९ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग भारतीय संघाने १४.१ षटकात ३ बळी गमावत सहज पूर्ण केला. या सामन्यात भारताकडून सलामीला आलेल्या शफली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी चांगली सुरुवात केली. काही चांगले आक्रमक शॉट्सही या दोघींनी खेळत सलामीला ८५ धावांची भागीदारी रचली. मात्र, दोघींचेही अर्धशतक थोडक्यात हुकले. दहाव्या षटकात मानधनाला सईदा अरुब शाहने बाद केले. स्मृतीने ३१ चेंडूत ४५ धावा केल्या. तसेच, १२ व्या षटकात शफलीला सईदाने ४० धावांवर त्रिफळाचीत केले. पण तोपर्यंत भारतीय संघ विजयाच्या जवळ पोहचला होता. मात्र, यादरम्यान तेराव्या षटकात दयालन हेमलता १४ धावांवर बाद झाली. पण अखेरीस भारताच्या विजयाची औपचारिकता कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमाह रोड्रिग्सने पूर्ण केली. हरमनप्रीत ५ धावांवर आणि जेमिमाह ३ धावांवर नाबाद राहिल्या. पाकिस्तानकडून सईदाने २ बळी, तर नशरा संधूने १ बळी घेतला. तत्पुर्वी, पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र,

### ■ भारताकडून पाकिस्तान चारीमुंड्या चित

पाकिस्तानचा संघ १९.२ षटकात १०८ धावांवर सर्वबाद झाला. सिद्रा अमीनने सर्वाधिक २५ धावा केल्या. तिच्याव्यतिरिक्त केवळ तौबा हसन आणि फातिमा सना या दोघींनाच २० धावांचा टप्पा पार करता आला. या दोघींनीही प्रत्येकी २२ धावा केल्या. तसेच, मुनीबा अलीने ११ धावा केल्या. भारताकडून गोलंदाजी करताना दिप्ती शर्माने सर्वाधिक ३ बळी घेतले. तसेच, पुजा वस्त्राकर, रेणुका सिंग ठाकुर आणि श्रेयंका पाटील यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### मानधनाच्या सर्वाधिक धावा

**या सामन्यात भारताकडून स्मृती मानधनाने सर्वाधिक ४५ धावा केल्या, त्यामुळे आंतरराष्ट्रीय महिला टी-२० क्रिकेटमध्ये मानधाना आता सर्वाधिक धावा करणारी भारतीय ठरली आहे. तिने हरमनप्रीत कौरला मागे टाकत हा विक्रम केला आहे. मानधनाच्या आता १३७ टी-२० सामन्यांत ३३६५ धावा झाल्या. तर, हरमनप्रीतने ३३४९ धावा केल्या आहेत.**

### विक्रमी भागीदारी

**मानधना आणि शफाली यांनी ८५ धावांची सलामी भागीदारी या सामन्यात केली. त्यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भागीदारी करताना ४००० धावा पूर्ण केल्या आहेत. महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भागीदारीत ४००० धावा करणारी त्यांची तिसरीच जोडी ठरली. यापूर्वी एलिसा हेली व बेथ मुनी आणि सुझी बेट्स व सोफी डिवाईन या दोन जोड्यांनी यापूर्वी असा विक्रम केला आहे.**

# ऑलिम्पिकसाठी खेळाडूने कापले बोट

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

खेळाडूंना आपल्या खेळाप्रती असलेली जिद्द कधी कधी चाहत्यांसह सर्वांनाच आश्चर्यचकित करत असते, आणि यातच पॅरिस ऑलिम्पिक सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या पुरुष हॉकी संघाचा खेळाडू मॅट डॉसनने असेच काहीसे केले आहे. खेळांच्या महाकुंभात सहभागी होण्यासाठी त्याने स्वत:चे चक्क बोट कापले आहे.

ऑस्ट्रेलियन पुरुष हॉकी संघाचा ३० वर्षीय खेळाडू मॅट डॉसन तिसऱ्यांदा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होणार आहे. पण मॅटला अलीकडेच उजव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाली होती. त्यावेळी त्याने अनेक डॉक्टरांचा सल्ला घेतला, त्या सर्वांनी त्याला सांगितले की ते बरे होण्यासाठी सुमारे २ आठवडे लागतील. त्यामुळे डॉसनला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेळणे कठीण वाटत होते. पण मॅटला तिसरे ऑलिम्पिक खेळायचे होते आणि त्यानंतर त्याने जे केले ते आश्चर्यकारक होते. डॉक्टरांनी त्याला दोन पर्याय दिले. एक म्हणजे ऑलिम्पिक खेळू नका, दुखापत बरी होऊ द्या किंवा तुमचे बोट कापून टाका. आश्चर्य चकित गोष्ट म्हणजे मॅटने बोट कापण्याचा निर्णय घेतला.



# अमित पंघाल मानसिकदृष्ट्या सक्षम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरण्यापूर्वी संघातून वगळण्यात आल्याचा सहन केलेला धक्का त्यामुळे अमित पंघालची मानसिकता कणखर झाली आहे. या ऑलिंपिकमध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय चमूतील तो मानसिकदृष्ट्या सक्षम असलेला खेळाडू असेल, असे मत माजी राष्ट्रकुल विजेता बॉक्सर अखिल कुमारने व्यक्त केले आहे. टोकियो ऑलिंपिक स्पर्धेत अमितला पहिल्याच फेरीत बाद व्हावे लागले होते. त्यानंतर भारतीय बॉक्सिंग संघटनेच्या एका तांत्रिक नियमामुळे अमितला संघातले स्थान गमवावे लागले होते. या सर्व आव्हानांचा सामना केल्यानंतर अमितने उमेद गमावली नाही. पॅरिस ऑलिंपिकसाठी त्याने आपली पात्रता सिद्ध केली. परिणामी त्याची मानसिकता मजबूत झाली आहे, असे अखिल कुमारने सांगितले. पिछेहाट होत असताना अमितने संधी मिळताच ती दोन्ही हाताने स्वीकारली आणि पॅरिस ऑलिंपिकसाठी ५१ किलो गटात आपली पात्रता मिळवली आहे.



# दिगंबर शिरवाडकर यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर कबड्डी असो.चे माजी खजिनदार दिगंबर शिरवाडकर यांचे शनिवारी (दि.२०) पहाटे प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले. निधनासमयी ते ८७ वर्षाचे होते. नुकतेच काही दिवसापूर्वी त्यांच्या मुलाचे निधन झाले होते.



शिरवाडकर यांनी जवळपास दोन तपे मुंबई शहर कबड्डी असो.च्या खजिनदार पदाची जबाबदारी सांभाळली होती. कित्येक वर्ष ते मुंबई शहरचे सदस्य देखील होते. काही काळ त्यांनी महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.चा जमाखर्च लिहिण्याची जबाबदारी देखील पार पाडली होती. आर्य सेवा मंडळाची कबड्डी स्पर्धा सातत्याने आयोजित करण्यात वसंत भालेकर यांच्या बरोबरीने शिरवाडकर यांचेही योगदान महत्त्वाचे होते. भालेकर यांच्या निधनानंतर काही वर्ष शिरवाडकर यांनी या स्पर्धा आयोजनाची जबाबदारी पार पाडली. शारीरिक शिक्षण मंडळापासून त्यांनी कबड्डी क्षेत्रात आपल्या कार्याला सुरुवात केली होती. गिरगाव येथील चंदन वाडी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गुजरात टायटन्सवर अदानीची नजर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**





आयपीएल फ्रँचायझी गुजरात टायटन्सची मालकी असलेल्या सीव्हीसी कॅपिटल पार्टनर्सने संघातील बहुतांश हिस्सा विकण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सीव्हीसीने २०२१ मध्ये ५६२५ कोटी रुपयांची मोठी रक्कम देऊन चार वर्षांसाठी फ्रँचायझी खरेदी केली होती. बीसीसीआयने आयपीएलबाबत तयार केलेल्या नियमांनुसार, फ्रँचायझीची मालकी विकत घेणारी कोणतीही कंपनी निश्चित लॉक-इन कालावधीपूर्वी तिचा हिस्सा इतर कोणत्याही कंपनीकडे हस्तांतरित करू शकत नाही.

सीव्हीसी कॅपिटलचा लॉक-इन कालावधी फेब्रुवारी २०२५ मध्ये संपत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अदानी ग्रुप आणि टोरेंट ग्रुपने गुजरात टायटन्स फ्रँचायझीची मालकी खरेदी करण्यात रस दाखवला आहे.

यावेळी अदानी ग्रुपने फ्रँचायझीसाठी ५१०० कोटी रुपयांची बोली लावली आहे, तर टोरेंट ग्रुपने ४६५३ कोटी रुपयांची बोली लावली आहे. गुजरात टायटन्स ही तीन वर्षे जुनी फ्रँचायझी आहे. तिचे मूल्य एक अब्ज डॉलर्स ते दीड अब्ज डॉलर्स दरम्यान असू शकते. आता गुजरात टायटन्सची मालकी कोणता ग्रुप घेणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## हरभजन सिंगचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** पाकिस्तानी पत्रकार फरिद खान यांनी ट्वीट केले की एमएस धोनी की मोहम्मद रिझवान? कोण सर्वोत्तम आहे? प्रमाणिकपणे सांगा. या ट्वीटवर हरभजनने उत्तर देताना लिहिले, आजकाल तू काहीपण बोलतोय का? काय मुर्खासारखा प्रश्न विचारला आहेस. भावांनो, याला सांगा, धोनी खूप पुढे आहे रिझवानपेक्षा. तू जरी रिझवानला विचारले, तरी तो याचे प्रामाणिकपणे उत्तर देईल. मला रिझवान आवडतो, तो चांगला खेळाडू आहे. पण तुलना चूकीची आहे. आत्ताच्या जागतिक क्रिकेटमध्येही धोनी अव्वल आहे.

# गीतगायन स्पर्धेचे आयोजन



**। पनवेल । वार्ताहर ।**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विठोबा खंडाप्पा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा शनिवारी (दि.२०) सकाळी संपन्न झाली.

या स्पर्धेत महाविद्यालयातील नऊ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पखवाज वादन व तबला वादन विद्यार्थी व शिक्षकांनी केले. या स्पर्धेसाठी अभंग, भक्ती गीते, सुगम संगीत व भावगीते असे विषय देण्यात आले होते. एकापेक्षा एक सरस आणि सुरस गाण्यांनी सारे वातावरण भक्तिमय झाले होते.

यावेळी स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्या वैशाली गावित यांनी केले. या स्पर्धेला परीक्षक म्हणून ज्येष्ठ शिक्षक सुनील धुमाळ व अर्जुन ठाकूर लाभले होते. या स्पर्धेचे नियोजन कलाशिक्षक पी.आर. नेरुरकर, स्पर्धा समिती प्रमुख प्रकाश भगत, रेश्मा गावंड, स्नेहा पाटील, मिलिंद भगत व कीर्तीदा शेळके यांनी केले. या स्पर्धेचे निवेदन कीर्तीदा संदीप शेळके यांनी व आभार प्रदर्शन प्रकाश भगत यांनी केले.

# हार्दिक पांड्याची कारकीर्द धोक्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

श्रीलंका दौऱ्यावर भारतीय संघाची घोषणा झाल्यानंतर सर्वाधिक चर्चा हार्दिक पांड्या आणि सूर्यकुमार यादवची होत आहे. खरंतर, बीसीसीआयने टी-२० संघाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे सोपवले आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत तो भारतीय संघाचा उपकर्णधारही होता. पण श्रीलंका दौऱ्यासाठी तो टी-२० संघात असला तरी त्याला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आलेली नाही. टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी करूनही हार्दिककडे कर्णधार म्हणून दुर्लक्ष करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सच्या पांड्याच्या कर्णधारपदावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

यातच आयपीएल २०२४ च्या हंगामातून हार्दिक पांड्याने मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन केले होते. रोहित शर्माला हटवून एमआयने हार्दिकला संघाचा कर्णधार बनवले होते, पण सूर्यकुमार यादवही मुंबई इंडियन्सकडून खेळतो आणि आता तो टी-२० मध्येही भारतीय संघाचा कर्णधार आहे. आयपीएल २०२५ चा मेगा लिलाव होणार आहे. अशा परिस्थितीत मुंबई इंडियन्सचा सूर्या मोठी ऑफर देऊ शकतो. श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा होण्यापूर्वी टी-२० मध्ये हार्दिक पांड्याला संघाचा कर्णधार बनवण्याची पूर्ण अपेक्षा होती, पण तसे काही घडले नाही. अशा स्थितीत भारतीय संघातील त्याच्या स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणार आहेत. पुढील वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीही होणार असून श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत हार्दिकला स्थान मिळालेले नाही. अशा स्थितीत त्याच्या कारकिर्दीवर आता प्रश्न उपस्थित होत आहेत.



## महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा

# पुरुष व महिला उपांत्य फेरीचा थरार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

**बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या संयुक्तविद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे पार पडत असलेल्या ७१ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेच्या पाचव्या दिवशी पुरूष विभागात पुणे ग्रामीण व अहमदनगर संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तर, महिला विभागात पुणे ग्रामीण व रत्नागिरी संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.**

पुरुष विभागात पुणे ग्रामीण संघाने नंदुरबार संघावर ३३-२६ गुणांनी मात करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. मध्यांतराला पुणे ग्रामीण संघकडे २०-१३ अशी आघाडी होती. पुणे ग्रामीण संघाच्या अक्षय सूर्यवंशी, तुषार आधावडे यांनी चौफेर चढाया केल्या. तर, ऋषिकेश भोजने व ओमकार लालगे या खेळाडूंनी पकडी घेतल्या.

पुरूष विभागातील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अहमदनगर संघाने पुणे शहर संघावर ४७-३७ असा विजय मिळवित अंतिम फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला अहमदनगर संघाकडे २९-१७ अशी आघाडी होती. अहमदनगर संघाच्या शिवम पठारे व शंकर गडई यांनी चौफेर चढाई करीत विजय मिळविला. प्रफुल्ल झावरे व संभाजी वाबळे यांनी पकडी घेतल्या. पुणे शहर संघाच्या सुनिल दुबिले, तेजस पाटील यांनी वेगवान खेळ करीत चढाई केल्या.



महिला विभागात पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई उपनगर पूर्व संघावर ४४-४२ अशा विजय मिळविला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघ १६-१९ असा पिछाडीवर होता. यानंतर पुणे ग्रामीण संघाने आपले आक्रमण वाढविले व बचाव देखील सुरेख केला. परिणामी त्यांनी विजय मिळविण्यात यश आले. पुणे ग्रामीणच्या निकिता पडवळ हिने चौफेर चढाया केल्या. तर, कोमल काळे हिने चांगल्या पकडी घेतल्या.

महिलांच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात रत्नागिरी संघाने पिंपरी चिंचवड संघावर २२-२० अशा गुणांनी विजय मिळवित अंतिम फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला रत्नागिरी संघ ८-९ अशा गुणांनी पिछाडीवर होता. रत्नागिरीच्या समरिन बुरोडकर हिने शानदार खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)